# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**दिनांक 08.08.2014 (का.प.क्र.-04)रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.**

शुक्रवार दिनांक 08.08.2014 रोजी मा.सभापती **श्री.विजय वाघचौरे** यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची स्थायी समितीची सभा महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातील मलीक अंबर स्थायी समिती सभागृह येथे दूपारी 12.10 वाजता वंदेमातरम् या गिताने सुरू झाली सभेला मा.प्र.आयुक्त तथा उपआयुक्त (प्र) श्री.रविंद्र निकम, प्र.नगर सचिव, श्री.प्रमोद का.खोब्रागडे यांचेसह संबधीत अधिकारी तसेच खालीलप्रमाणे सन्माननीय सदस्य उपस्थित होते.

01. स.स.श्री.त्र्यबंक गणपतराव तुपे
02. स.स.श्री.अनिल जुगललाल जैस्वाल
03. स.स.श्री.जगदीश कन्हैय्यालाल सिध्द
04. स.स.श्री.अनिल श्रीकिसन मकरिये
05. स.स.श्री.सुरेंद्र माणिकराव कुलकर्णी
06. स.स.श्री.मिर हिदायत अली मिर बसालत अली
07. स.स.श्री.रवि साहेबराव कावडे
08. स.स.श्री.संजय सांडु चौधरी
09. स.स.श्री.जहांगीर खान अब्बास खान
10. स.स.सौ.प्रिती संतोष तोतला
11. स.स.श्रीमती फिरदोस फातेमा

श्री.त्रिंबक तुपे :डेंग्यु आजाराने शहर ग्रस्त झालेले आहे विशेषत: हडको सिडको या भागात जास्त प्रमाणात लागण झालेली आहे. चार नागरीकांचा यामुळे मृत्यु झालेला आहे. एका उत्कृष्ठ खेळाडुंचा यामध्ये समावेश आहे. सिडको हडको भागात खाजगी कंत्राटदाराकडुन काम करण्यात येते. कामामध्ये त्रृटी असल्याचे दिसुन आलेले आहे. तसेच सिडको हडको भागात डेंग्यु पसरण्याचे नेमके कारण काय? याचा शोध लागणे आवश्यक आहे. तसेच शाळांमध्ये फवारणी करत असतांना शाळेच्या सुट्टीच्या दिवशी फवारणी करण्यात यावी आणि तशा सूचना संबंधीत अधिकाऱ्यांना द्याव्यात.

श्री.मीर हिदायत अली :सिडको हडको भागामध्ये डेंग्युचा प्रसार जास्त प्रमाणात आहे. चार वर्षापासून संबधीत कंत्राटदारांना देण्यात आलेले आहे. त्यांचेकडून व्यवस्थित कामे होत नाहीत, त्यामुळे आजपर्यंत जे बील देण्यात आले ते बोगस होते का? फवारणी न करता बिल उचलण्यात आलेले आहे. असे यावरून दिसते.

श्री.त्रिंबक तुपे :सभागृहातील माईकची व्यवस्था चांगल्या प्रकारे करण्यात यावी. माईकची उंची वाढविण्यात यावी याबाबतीत योग्य ते नियोजन करण्यात यावे.

मा.सभापती :माईकची उंची वाढविण्यासंबधाने योग्य ते नियोजन करण्यात यावे.

शहर अभियंता :मी याबाबत तातडीने काम करण्याची सुचना संबंधीत अधिकाऱ्यांना देतो.

श्री.सुरेंद्र कुलकर्णी :स.सदस्यांनी डेंग्यु संदर्भात चर्चा केलेली आहे. डेंग्यु आजार हा सिडको हडको भागातच जास्त प्रमाणात लागण झाल्याचे दिसत आहे. सिडको हडको भागात खाजगी कंत्राटदारामार्फत साफसफाई व फवारणीचे काम चालते. डेंग्यु जास्त

प्रमाणात पसरण्याचे कारण म्हणजे सिडको हडको भागात व्यवस्थितरित्या सफाई तसेच फवारणी चांगल्या रितीने झालेली नसल्याने डेंग्यु सदृश डांसांचा उपद्रव या भागामध्ये वाढलेला आहे. यावरून कामाची बीले बोगस उचललेली जाते. कचरा डंपिंग करण्याच्या ठिकाणी पावडरची फवारणी केली जात नाही. कचरा उचलल्या नंतर पावडरची फवारणी कुठेही दिसुन येत नाही. ही बाब योग्य नाही.

श्री.अनिल जैस्वाल :माझ्या वार्डातील यश जनार्धन गावंडे रूग्णाला डेंग्यु या आजाराने रूग्णालयात आयसीयुमध्ये ॲडमिट केले आहे. महानगरपालिकेच्या पथकाने प्रत्यक्ष स्थळी भेट दिलेली आहे. आयसीयुमधील खर्च मोठया प्रमाणात आहे. डासांचा उपद्रव कशामुळे झाला. एन -7 येथील पाण्याचे टँकर भरणा केली जात, त्या ठिकाणी मोठया प्रमाणात खड्डे पडलेले आहे त्यामध्ये कित्येक दिवस पाणी साठुन राहते, कचरा व्यवस्थित उचलला जात नाही. पावडरची फवारणी करण्यात येत नाही. प्रशासनाने याबाबतची काळजी घेतली पाहिजे.

श्रीमती प्रिती तोतला: वार्डामध्ये फॉगींग मशीनद्वारा फवारणी नियमित न होता काही वार्डामध्येच फवारणी केली जाते. याबाबत संबधीतास विचारणा केली असता डिझेलचे प्रमाण कमी असल्याने आवश्यक त्या वार्डामध्ये, काही ठिकाणी फॉगींगद्वारा फवारणी करण्यात येते असे उत्तर देण्यात आले आहे. तरी प्रशासनाने या गोष्टीकडे गांभीर्याने लक्ष देवुन डिझेलचा पुरवठा पुरेशा प्रमाणात होईल, याची दक्षता घेण्यात यावी. शहरात डेंग्युचा प्रार्दुभाव वाढल्याने डिझेल जास्त प्रमाणात पुरवठा करण्याचे आदेश देण्यात यावे जेणे करून सर्व वार्डामध्ये फवारणी केली जाईल. तसेच नागरीकांच्या रोषाला सामोरे जावे लागणार नाही. नाल्याच्या बाजुला असलेला कचरा लिफ्ट केला जात नाही. वार्डामध्ये गढुळ पाण्याचे प्रमाण जास्त आहे. वॉटस्अप या सोशल नेटवर्कद्वारे नागरीकांनी गढुळ, काळया रंगाचे पाणी येत असल्याबाबत क्लिप पाठविलेली आहे.

(स.सदस्या वॉटस्अप या सोशल नेटवर्कद्वारे नागरीकांनी गढुळ पाणी येत असल्याबाबतची क्लिप मा.सभापती तसेच शहर अभियंता यांना सभागृहामध्ये दाखविण्यात येते)

श्री.अनिल जैस्वाल :दिनांक 25.10.2013 रोजी आरोग्य अधिकारी यांना पत्र देवुन वार्ड क्रमांक 19 येथे फवारणीच्या कामासाठी खाजगी ठेकेदार आहे. त्यांचे कामाचे बिले न देण्याचे बाबतीत परत 29.05.2014 रोजी पुन्हा पत्र देण्यात आले की, कंत्राटदाराकडून कामे व्यवस्थित होत नाही. म्हणून तरीही संबधीत ठेकेदाराला काम न करता 10 महिण्यांचे आदेश देण्यात आले आणि संबधीत ठेकेदार सात लाख रूपयांचे बील काढण्याच्या तयारीत आहे. माझे असे म्हणणे आहे की, ज्या अधिकारी यांनी सदरील कार्यादेश संबधीताला दिलेले आहे, त्यांना निलंबीत करण्यात यावे. कारण कंत्राटदाराकडून कामे व्यवस्थित होत नाही. त्यामुळे डेंग्युचा प्रादुर्भाव वाढलेला आहे त्यास जबाबदार असणाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी आणि महानगरपालिकेतर्फे सदरील काम करण्यात यावे.

श्री.संजय चौधरी :शहरात डेंग्यु रोगाच्या बाबतीत वार्डातील समस्याबाबत स.सदस्यांनी या ठिकाणी मुद्दे मांडलेले आहे. चिकलठाणा परिसरातील कु.प्राची नावाची विद्यार्थीनी डेंग्यु सदृश आजाराने आयसीयुमध्ये ॲडमिट केलेले आहे. आयसीयुमध्ये एका दिवसाचा चार्ज पाच हजार रूपये येत आहे. फॉंगीगचे काम नियमित न झाल्यामुळे ही समस्या निर्माण झालेली आहे. वार्डात फवारणी न करता बील उचलण्यात येते.

श्री.बागाडीना नावाचे व्यक्ती हे काम करतात त्यांना अनेक फोन लावुन समस्येबाबत व फवारणी बाबत विनंती करण्यात आली, परंतु त्यास संबधीत व्यक्तीकडून प्रतिसाद देण्यात आलेला नाही. फवारणी सर्व वार्डामध्ये करण्यात येत नाही आणि महानगरपालिकेच्या प्रशासनाचे त्यांचेवर कुठल्याच प्रकारचा वचक नाही. सर्व संबधीत ठेकेदारांना आर्थीक दंड करण्यात यावा. संबधीत सर्व अधिकारी यांनी कामाकडे दुर्लक्ष केलेले आहे. त्यांना आर्थिक दंड लावण्यात यावे.

श्री.त्रिंबक तुपे :सर्व स.सदस्यांच्या भावना लक्षात घेवुन डेंग्युवर संबधीत अधिकारी यांनी खुलासा करण्यास सांगण्यात यावे. सिडको हडको भागात महानगरपालिकेतर्फे विशेष मोहिम राबविण्यात यावी. संबधीत कंत्राटदाराने कामामध्ये दुर्लक्ष केलेले आहे. महानगरपालिकेच्या माध्यमातुन फवारणीचे काम करण्यात यावे. संबधीताचे कंत्राट रद्द करण्यात यावे. फवारणीची मोहिम राबवित असतांना शाळांमध्ये शक्यतो सुट्टीच्या दिवशी मोहिम राबविण्यात यावी.

मा.सभापती :संबधीत अधिकारी यांनी प्रकरणाचा सविस्तर खुलासा करण्यात यावा.

आरोग्य वैद्यकीय अधिकारी:डेंग्यु सदृश रूग्ण साधारणतः मे महिण्यात आढळुन आला. मे महिण्यात संशयीत रूग्णांची संख्या 8 होती, जुन महिन्यामध्ये 35, जुलैमध्ये 119 डेंग्यु सदृश रूग्ण आढळुन आलेले आहे. शासकीय रूग्णालयात पाठविण्यात आलेल्या सॅम्पलमधील जुन महिन्यातील सात रूग्णांचे रिपोर्ट पॉझेटिव्ह आलेले आहेत. ऑगस्ट महिण्यामध्ये संशयित रूग्णांच्या संख्येमध्ये वाढ झालेली आहे. या रोगाचा उद्रेक होण्याची शक्यता लक्षता घेवुन डेंग्यु आजारावर नियंत्रण मिळविण्याकरीता कोणकोणत्या उपाययोजना करता येईल, या दृष्टीने आरोग्य विभागातर्फे विशेष मोहिम राबविण्यात येत आहे. सिडको हडको भागामध्ये खाजगी कंत्राटदारामार्फत फवारणीचे काम दिलेले होते, संबधीत कंत्राटदार फवारणीच्या कामामध्ये कमी पडलेला आहे. डेंग्यु आजारावर नियंत्रणासाठी मा.आयुक्तांशी चर्चा करून आरोग्य विभागातील स्वच्छता निरीक्षक व इतर कर्मचा-यांशी चर्चा करून निरीक्षण करण्यात आले, काम करतांना निरीक्षणात्मकदृष्टया कंत्राटदार कमी पडत आहे, मॉस्कीटो डेंन्सीटी काढण्यात आली तसेच स.नगरसेवकांनी दिलेल्या अहवालानुसार संबधीत वार्डांवर लक्ष केंद्रित करण्यात आले. डेंग्युचा डास स्वच्छ पाण्यामध्ये वाढ होत असते, अबेट हे औषध अळीनाशक औषध आहे. अळयांना नष्ट करण्यासाठी त्याचा वापर केला जातो. आरोग्य विभागातर्फे 100 टक्के अबेट ट्रिटमेंट करण्याचे उदिष्ट ठरविलेले आहे. त्यानुसार सहा झोनमध्ये 512 कर्मचारी यांची या कामासाठी नेमणुक केलेली आहे. अडीच लाख घरांमध्ये अबेट ट्रिटमेंट करण्याचा निर्णय घेतलेला आहे. आजपर्यंत 70 टक्के काम पुर्ण झालेले आहे. दोन लाख पंचेचाळीस हजार घरांमध्ये अबेट ट्रिटमेंटचे उद्दिष्ट पुर्ण केलेले आहे. चार लाखाच्या आसपास पाण्यांचे कंटेनर्सची तपासणी केलेली आहे. त्यामध्ये डास अळया मोठया प्रमाणात आढळुन आलेल्या आहेत. त्याची संख्या पाच हजार छत्तीस आढळुन आली आहे. घराघरातील पाणी साठयामध्ये डास आळया आढळुन आलेल्या आहेत. या अळया नष्ट करण्याची कार्यवाही केलेली आहे. सदर ॲक्टीव्हिटी दर पंधरा दिवसांनी करावी लागणार आहे. स.सदस्य यांनी उपस्थित केलेल्या मुद्दयानुसार फवारणीची मोहिम शाळेत सुट्टीच्या दिवशी राबविण्यात येणार आहे. याबाबत शहरातील सर्व शाळांचे मुख्याध्यापक यांना पत्र देवुन कळविण्यांत आलेले आहे की, याबाबत

जनजागृती करण्यात यावी, फवारणीची आवश्यकते विषयी तसेच फवारणी करतांना आपल्या शाळेतर्फे जबाबदार कर्मचारी महानगरपालिकेच्या फवारणी करतांना सोबत देण्यात यावा. त्याच्या निगरानी खाली काम करण्यात येणार आहे, म्हणुन पत्र देण्यात आलेले आहे. शाळेच्या मुख्यध्यापकाने फवारणी विषयी आरोग्य विभागाला कळविल्यास त्यानुसार शाळेमध्ये फवारणी करण्यात येईल. डासांचा उपद्रव रोखण्यासाठी शहरात फवारणीची मोहिम जोरदार राबविण्यात येत आहे. सकाळी सहा वाजता फवारणीचे नियोजन करण्यात येते. फवारणी करतांना आवश्यक त्या ठिकाणीच फॉगींग करण्यात येते याचे कारण म्हणजे डिझेलची कमी आहे. डिझेल जास्त प्रमाणात पुरवठा केल्यास वार्डामध्ये फवारणीचे काम करण्यात येईल.

श्री.त्रिंबक तुपे :प्रभागामध्ये सर्व वार्डामध्ये फवारणीचे काम करण्यात यावे, फवारणी करतांना डिझेल अभावी काम अर्धवट न सोडता डिझेल संपल्यावर जागेवरच डिझेलची व्यवस्था करण्यात यावी. फवारणीची मोहिम ही नियमित चालू ठेवण्यात यावी. सिडको हडको येथील फवारणीच्या कामाबाबत सर्वच स.सदस्य नाराज आहेत त्यामुळे महानगरपालिकेच्या माध्यमातुन काम केल्यास चांगल्याप्रकारे काम होईल. महानगरपालिकेच्या माध्यमातुन काम करण्यात यावे. तसेच शहरामध्ये चार नागरीकांचा मृत्यु झालेले आहे ते कशामुळे झालेले आहे याची माहिती समोर आली पाहिजे. जी मोहिम शहरात राबविण्यात येते आहे ती पुढेही राबविण्यात यावी.

मा.सभापती :डेंग्यु आजाराची सुरवात ही हडको,सिडको भागात वार्ड ब आणि ईमध्ये झालेली आहे. सिडको, हडको भागातील फवारणीचे काम किती दिवसांपासून संबधीत कंत्रादार यांना दिलेले आहे. किती कर्मचारी संबधीताकडे आहे काम केले जाते का? संबधीतावर कोणती कारवाई केलेली आहे, याबाबत सविस्तर खुलासा करण्यात यावा.

आरोग्य वैद्यकीय अधिकारी:वार्ड ब आणि ई मध्ये सहा कंत्राटदार नेमलेले आहेत. दिनांक 01.06.2013 रोजी मुदतवाढ दिलेली आहे. वार्ड ई मध्ये गणेश पेस्ट कंट्रोल यांना काम दिलेले आहे. चार कंत्राटदार यांचेकडे स्वत:ची मशनरी आणि कर्मचारी आहे. दोन कंत्राटदार यांना मेडिसीनसह कंत्राट दिलेले नव्हते, फेरनिवीदा काढुनही निवीदा न आल्याने जुन्या दराने काम नियमित ठेवण्यात आले.

श्री.त्रिंबक तुपे :महानगरपालिका मेडिसीन दिल्यानंतर संबधीत ठेकेदार किती प्रमाणात वापर करतो हे प्रश्नचिन्ह आहे. याबाबत महिन्याचा आणि एकंदरीत वर्षाचा किती खर्च होतो, याची माहिती देण्यात यावी.

आरोग्य वैद्यकीय अधिकारी:इतर चार कंत्राटदार महिण्याचा स्टॉक महानगरपालिकेकडे जमा करतात, रोजचे आवश्यक ते मेडिसीन महानगरपालिकेतर्फे काढुन देण्यात येते. दोन कंत्राटदार यांना महानगरपालिकेचा कर्मचारी समप्रमाणात मेडिसीन देण्यात येते. जुन्या दराने काम दिलेले आहे त्यांना 84,407/- प्रती महा आदेश दिनांक 31.12.2013 पर्यंतचा होतो, तो आदेश संपलेला आहे. त्यानंतरचे पेमेंट सध्या दिलेले नाही.

मा.सभापती :वर्षभर वार्डावर किती खर्च होतो.

आरोग्य वैद्य.अधिकारी : महानगरपालिकेतर्फे मेडिसिन देण्यात येते त्यांना 84,407/- प्रती महा खर्च येतो, आणि इतर 2,09000/- प्रती महा खर्च येतो.

श्री.मीर हिदायत अली :खाजगी कंत्राटदारा मार्फत फवारणीचे काम गांर्भियाने करण्यात येत नव्हते. चार वर्षामध्ये साधारण 48 लाख रूपये खर्च करण्यात आलेले आहे. जुन्या शहरात महानगरपालिकेतर्फे चांगल्यारितीने काम चालु आहे. फवारणीचे, साफसफाईचे काम महानगरपालिकेतर्फे करण्यात यावे.

श्रीमती प्रिती तोतला :आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांनी डेंग्यु आजाराबाबत शहरात उद्‌भलेल्या उद्रेकाबाबत चांगले सर्वेक्षण केलेले आहे, काम चांगले केलेले आहे. शहरात डेंग्युची लागण झालेली आहे हे आज पाहिल्यांदा सभेमध्ये मान्य केलेले आहे. सिडको हडकोमध्ये ठेकेदारामार्फत काम केले जाते ते समाधानकारक नाही. महानगरपालिका आर्थीक अडचणी मध्ये आहे, स्पिल ओव्हरचे कामे करण्यात येत नाही. अशा स्थितीमध्ये संबधीत कंत्राटदाराचे कंत्राट रद्द करण्यात यावे. महानगरपालिकेच्या माध्यमातुन काम करण्यात यावे.

श्री.जगदिश सिध्द :शहरात चार व्यक्तींचा मृत्यु झालेला आहे परंतु मृत्यु कशामुळे झाला याचे निदान झालेले नाही. जबाबदारी घेण्यास कुणी तयार नाही. मागील महिण्याच्या सर्वसाधारण सभेमध्ये आजाराबाबत उपाययोजना संबधी आश्वासन दिले होते. त्याच वेळी कारवाई केली असती तर चार व्यक्तींचा मृत्यु झाला नसता. दोषींवर कोणती कारवाई करणार?

श्री.त्रिंबक तुपे :आजारावरील उपाययोजना कोणत्या कराव्या लागतील याचा विचार करणे गरजचे आहे. महानगरपालिकेकडे कोणते पर्याय आहे. नागरीकांना धीर देण्याची गरज आहे. जनजागृती वाढविली पाहिजे.

श्री.अनिल जैस्वाल :अश्विनी बोलकर या राष्ट्रीय खेळाडुचे डेंग्युमुळे निधन झालेले आहे. सभागृहातर्फे श्रध्दांजली वाहण्यात यावी.

श्री.जहॉगीर अ.खान :शहागंज येथील जुनी भाजीमंडई येथे दहा ट्रक कचरा निघेल एवढा कचरा साठलेला आहे. प्रशासनाचे याकडे दुर्लक्ष आहे. त्यामुळे आजाराचे प्रमाण वाढत आहे.

मा.सभापती :स.सदस्यांनी सूचना केल्याप्रमाणे तात्काळ सदरील ठिकाणचा कचरा उचलुन साफसफाई करण्याची कारवाई करण्यात यावी. शहरात डेंग्यु आजाराने मृत्युमुखी पडलेल्या नागरीकांच्या घरी जावुन कोणत्या आजाराने त्यांचा मृत्यु झाला याची माहिती घेण्यात यावी  व शहानिशा करण्यात यावी. तसेच सिडको हडको येथील खाजगी कंत्राटटार यांना मुदतवाढ न देता त्यांचा करार रद्द करण्यात यावा. संबधीत कंत्राटदार यांची चौकशी करण्यात येवुन पेमेंट थांबविण्यात यावे.महानगरपालिकेच्या माध्यमातुन साफसफाई तसेच फवारणी करण्यात यावी.

श्रीमती प्रिती तोतला :औरंगपुरा येथील चंद्रकांत कॉम्लेक्स येथे प्रचंड प्रमाणात घाण असुन मोठया खड्डयामुळे पाणी अनेक दिवस साठत असुन अस्वच्छता पसरत आहे. तरी तातडीने याचा बंदोबस्त करण्यात यावा.

मा.सभापती :खुलासा करण्यात यावा.

कार्यकारी अभियंता (बीओटी):औरंगपुरा येथील बीओटीवरील भाजीमंडईचे काम करण्यात येत आहे. त्या ठिकाणी मोठया खड्डयांमध्ये पाणी साठलेले आहे. त्याचे डिवॉटरींग करण्यात आलेले असुन काम थांबण्याचे कारण म्हणजे काही व्यक्तींनी न्यायालयातुन स्टे आणलेला आहे. 34 जणांना पर्यायी जागा दिलेली आहे. चार व्यक्तींचा प्रश्न प्रलंबित आहे, तात्काळ प्रश्न मार्गी लावण्यात येईल.

मा.सभापती :खड्डे बुझविण्याचे काम तात्काळ करण्यात यावे.

कार्यकारी अभियंता (बीओटी):खड्डयांमध्ये पाणी साचणार नाही याची काळजी घेतली जाईल.

प्र.आयुक्त :शहागंज येथील कचरा उचलण्याबाबतची कार्यवाही तात्काळ करण्यात येईल.

मा.सभापती :कचरा उचललल्यानंतर पावडर फवारणी करण्यात येत नाही, फवारणी का करण्यात येत नाही, याबाबत व पावडरच्या साठयाबाबत खुलासा करण्यात यावा.

प्र.आयुक्त :घनकचरा व्यवस्थापन प्रमुख यांनी याबाबत खुलासा करण्यात यावा.

घनकचरा व्य.प्रमुख :महानगरपालिकेकडे कार्बोलिक पावडरचा पुरेसा साठा उपलब्ध नाही. याबाबत पत्रव्यवहार केलेला आहे.

श्री.त्रिंबक तुपे :कचरा उचलल्यानंतर कार्बोलिक पावडरचा शिडकाव केला जात नाही. शहरात डेंग्युचा उपद्रव वाढत असतांना पावडरची पुरेसा प्रमाणात साठा नाही ही शोकांतिका आहे. पावडरचा साठा वार्ड निहाय किती उपलब्ध आहे. खुलासा करण्यात यावा?

घनकचरा व्य.प्रमुख :पावडरच्या साठयाबाबत वार्ड अधिकारी यांचेकडुन माहिती घ्यावी लागेल.

श्री.त्रिंबक तुपे :सर्व वार्ड अधिकारी यांचेकडुन माहिती घेण्यात यावी.

मा.सभापती :वार्ड अधिकारी यांनी खुलासा करण्यात यावा.

श्री.त्रिंबक तुपे :साठा किती आहे? मागणी किती आहे? याबाबतची सत्य माहिती सभागृहाला देण्यात यावी.

वार्ड ड अधिकारी :वर्षभराची साहित्याची मागणी स्टोअरकडे नोंदविण्यात येते, त्यानुसार वार्ड कार्यालयाकडुन आवश्यक मागणीनुसार साहित्याचा पुरवठा केला जातो. वार्ड ड कार्यालयात 20 किलोच्या (कार्बोलिक पावडर) पाच बॅग बऱ्याच दिवसापासूनच्या आहेत. स्वच्छता निरीक्षक यांना आवश्यक असणारे साहित्याची मागणी देण्यासंदर्भात सूचना दिलेल्या आहेत.

श्रीमती प्रिती तोतला :पावसाळा सुरू होण्यापुर्वी गटारी काढायच्या असतात ते काम वार्ड इंजिनिअर म्हणतात वार्ड अधिकारी यांनी करायला पाहिजे वार्ड अधिकारी म्हणतात वार्ड इंजिनिअर यांनी केले पाहिजे. यामुळे नगरसेवक त्रस्त होतात. गटार ओपन करण्यासाठी वार्ड कार्यालयाला फावडे, टोपल्याची मागणी केली होती. पंरतु आजपर्यंत मागणी पुर्ण झालेली नाही.

श्री.त्रिंबक तुपे :स्वच्छतेचे काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना साहित्याचा पुरवठा केला जात नाही. पावसाळयातील रेनकोट,बुट, हातमौजे देण्यात येत नाही. त्यांच्या आरोग्याची काळजी घेणे महत्वाचे आहे. स्वच्छतेच्या बाबतीत वार्ड अधिकारी यांच्या मागण्या मान्य करणे आवश्यक आहे. नागरीकांचे आरोग्य चांगले ठेवण्यासंदर्भातील कामे कर्मचाऱ्यांच्या माध्यमातुन केले जाते.

वार्ड ड अधिकारी :दिवाणदेवडी येथील गटार स्वच्छ करण्यात आलेली आहे.

श्रीमती प्रिती तोतला :येत्या 25 दिवसात गणपती उत्सव आलेला आहे. मंडप उभारणी केल्यामुळे रस्त्यांवरून हार्डोलिक रिक्शा, हातगाडी जाणार नाही. त्याचे नियोजन आजपासूनच करण्यात यावे.

वार्ड ड अधिकारी :याबाबतचे नियोजन करण्यात आलेले आहे. जास्तीच्या हातगाडया यांत्रिकी विभागाकडुन देण्यात येणार आहे.

श्रीमती फिरदोस फातेमा :शहरात डेंग्यु, मलेरिया तसेच गढुळ पाण्यामुळे अनेक रोग निर्माण होत आहे. माशांचे प्रमाण वाढलेले आहे. या रोगांचे रोखथाम झाले पाहिजे. शहरात जनावरांचे गोठे मोठया प्रमाणात आहे. त्यामुळे शहरात अस्वच्छता पसरलेली आहे. शहरातील सर्व गोठे शहराबाहेर स्थलांतरीत करणार होते याबाबत खुलासा करण्यात यावा.

| | |
|---|---|
| मा.सभापती | :संबधीत अधिकारी यांनी प्रकरणाचा खुलासा करावा. |
| पशुसंवर्धन अधिकारी | :महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये 700 च्या आसपास गोठे असुन सात हजार जनावरे आहेत. त्याचे मलमुत्र नाल्यांमध्ये सोडण्यात येते. चिकलठाणा येथे सर्वे नंबर 308 येथे जनावरांच्या गोठयांसाठी 08 एकर जागा उपलब्ध झालेली आहे. मा.सर्वसाधारण सभेने घेतलेल्या निर्णयानुसार जनावारांच्या गोठयांसाठी सर्वे करून यावर डीपीआर नेमणुक करायची आहे. टप्प्याटप्प्याने जनावरे शहराबाहेर शिफ्ट करण्याचे नियोजन आहे. |
| श्री.त्रिंबक तुपे | :जनावरांचे मलमुत्र सर्व ड्रेनेजलाईनमध्ये सोडण्यात येते. याबाबतीत प्रशासनाने तात्काळ कारवाई करणे अपेक्षित आहे. डिपीआर संदर्भांतील कारवाई करण्यात यावी. |
| श्री.संजय चौधरी | :गोठयांसंदर्भांत इस्टीमेट तयार करण्यात आले होते, त्याबाबत कुठली कार्यवाही झाली, माहिती देण्यात यावी. |
| पशुसंवर्धन अधिकारी | :संचिका पुटअप करण्यात आलेली आहे. |
| श्री.मीर हिदायत अली | :वार्ड क अधिकारी यांचेकडुन खुलासा घेण्यात यावा. |
| श्री.जहॉगीर अ.खान | :वार्ड क कार्यालयाचा खुलासा घेण्यात यावा. |
| श्री.संजय चौधरी | :गोठया संदर्भांत 53 लाख रूपयांच्या कामाची संचिका एका वर्षापासून प्रलंबित आहे. |
| मा.सभापती | :खुलासा करण्यात यावा. |
| कार्य.अभियंता (बीओटी) | :गोठे स्थलांतरीत करण्यासंदर्भांत कारवाई करण्यात आलेली असुन डिपीआर तयार केलेला आहे डिपीआरची किंमत 136 कोटी रूपये आलेली आहे. चिकलठाणा येथील 20 एकर जागेवर जनावरे शिफ्ट करायची आहेत. ॲप्रोच रोडची समस्या होती ती समस्या सुटलेली आहे. |
| मा.सभापती | :याबाबत जागेची सविस्तर स्थळ पाहणी करण्यात येईल, त्यानंतर संपुर्ण माहिती देण्यात यावी. |
| मा.सभापती | :वार्ड क अधिकारी यांनी खुलासा करावा. |
| वार्ड अधिकारी-क | :वार्डामध्ये कार्बोलिक पावडरच्या आठ गोण्या शिल्लक आहे, पावडरचा सप्लाय कमी झालेला असल्यामुळे आवश्यक त्या ठिकाणीच पावडरचा शिडकाव करण्यात आलेला आहे. 100 गोण्यांची मागणी आहे. भांडार विभागातुन सर्व साहित्य प्राप्त झालेले असुन कर्मचाऱ्यांना वाटप करण्यात आलेले आहे. तसेच वार्डामध्ये दोनच सॅनेटरी इन्स्पेक्टर आहेत वार्ड क कार्यालयाचा परिसराचा व्याप मोठा असल्याने दोन कर्मचाऱ्यांकडुन काम करून घेणे अवघड होते, तरी एका एस.आय.ची वार्ड क कार्यालयात नेमणुक करण्यात यावी. |
| श्री.मीर हिदायत अली | :श्री.काद्री आणि श्री.कुलकर्णी हे दोन एस.आय वार्ड क कार्यालयाअंतर्गत काम करतात परंतु त्यांचेकडे पुरेसे साहित्य उपलब्ध नसल्याने साफसफाईच्या कामांमध्ये अडथळा येत आहे. |
| श्री.त्रिंबक तुपे | :कर्मचाऱ्यांची कमतरता आहे त्यामुळे प्रशासनाने योग्य नियोजन करून पर्यायी म्हणुन वार्ड क कार्यालयात एका एस.आय.ची नेमणुक करण्यात यावी. |
| मा.सभापती | :वार्डातील साफसफाई योग्य रितीने होण्याकरीता एक अतिरिक्त एस.आयची वार्ड क कार्यालयात नेमणुक करण्यात यावी. सर्व वार्डांना समान एस.आय.ची नेमणुक करण्यात यावी. |

श्री.सुरेंद्र कुलकर्णी :महानगरपालिकेच्या मुख्य इमारतीला लागुन असलेल्या नाल्यामुळे प्रचंड दुर्गंधी पसलेली आहे. नाल्यामध्ये कचरा मोठया प्रमाणावर अडकुन पडलेला आहे. आजुबाजुचे नागरीक जनावरांचे मांस नाल्यामध्ये टाकत असल्याने आरोग्याचा प्रश्न निर्माण झालेला आहे. तरी प्रशासनाने तात्काळ नाल्याची साफसफाई संदर्भांत कारवाई करण्यात यावी.

मा.सभापती :पाण्याच्या नादुरूस्त टाक्या त्वरीत दुरूस्त करण्यात याव्या. प्रशासनाने तात्काळ नाला साफसफाई संदर्भांत कारवाई करावी.

श्री.्मीर हिदायत अली :12887 सर्वे क्रमांक बाबतचा विषय मागील बैठकीत ठेवण्यात आलेला होता सदरचा विषय मा.सभापती यांनी स्थगीत ठेवलेला आहे. नगर रचना विभागाकडुन पत्र पाठविण्यात आले आहे की, सदरचा विषय वगळण्यात यावा. याबाबत प्रकरणाची चौकशी करण्यात यावी. रस्ता रूंदीकरणात बाधीत मालमत्तांचा मोबदला देण्याचे किती तरी नागरीक बाकी आहे, महानगरपालिकेची आर्थीकस्थिती बरोबर नसतांना एका व्यक्तीवरच महानगरपालिका मेहरबान का होते, याची चौकशी करण्यात यावी.

श्री.त्रिंबक तुपे :सभागृहापुढे विषय मांडण्यात आला तो चुकीचा होता का की, सभागृहाने घेतलेला निर्णय चुकीचा होता, याबाबत खुलासा करण्यात यावा. चुकून सभागृहाने मान्यता दिली असती तर सभागृह अडचणीमध्ये आले असते.

मा.सभापती :खुलासा करण्यात यावा.

उपअभियंता न.र.(श्री.रामटेके):प्रस्तावासंदर्भांत काही नागरीकांच्या तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत, त्याची चौकशी करण्यासाठी तात्पुरता प्रस्ताव ठेवण्यात येवु नये, म्हणुन परत मागविण्यात आलेला आहे.

श्री.त्रिंबक तुपे :सदस्यांनी प्रस्तावासंदर्भांत तक्रारी मांडलेल्या असल्यामुळे तसेच प्रस्तावामध्ये काही त्रृटी असल्याकारणाने प्रस्ताव थांबविण्यात आला. खुलासा करण्यात यावा.

उपअभियंता न.र.(श्री.रामटेके):त्रृटीची शाहनिशा करण्यासाठी प्रस्ताव थांबविण्यात आलेला आहे.

श्री.मीर हिदायत अली :महानगरपालिकेच्या डोळयामध्ये धुळफेक करून करोडो रूपयांचा महापालिकेला चुना लावलेला आहे.

श्री.त्रिंबक तुपे :महानगरपालिकेच्या माध्यमातुन संबधीतास रस्ता तयार करून द्यायचा एफएसआय वापर करू दयायचा परंतु इतर गरीब नागरीकांचा विचार करण्यात येत नाही. प्रस्तावामध्ये त्रृटी कोणत्या होत्या तसेच प्रस्ताव मागे घेण्याचे कारण काय? याची माहिती देण्यात यावी. याबाबत चौकशी करून गुन्हे दाखल करण्यात यावे.

मा.सभापती :स.सदस्यांनी जो मुद्दा मांडलेला आहे त्या संदर्भांत पुढील बैठकीत सविस्तर खुलासा करण्यात यावा.

श्री.संजय चौधरी :मागील बैठकीमध्ये गुंठेवारीमध्ये प्रलंबित असलेले सर्व प्रकरणे निकाली काढण्यासंदर्भांत आदेशित केलेले होते. खुलासा करण्यात यावा.

मा.सभापती :संबधीत अधिकारी यांनी खुलासा करावा.

गुंठेवारी कक्ष प्रमुख :चिकलठाणा भागातील 22 प्रकरणे प्रलंबित आहे. पुर्वीच्या संचिका निकाली काढण्यात आलेल्या आहेत.

श्री.संजय चौधरी :संचिका प्रलंबित आहे. निकाली काढण्यात आलेल्या नाहीत.

गुंठेवारी कक्ष प्रमुख :वार्डाकडुन संचिका मागविण्यात आल्या होत्या, परंतु कर्मचारी नसल्याकारणाने संचिका पाठविण्यात आल्या नाही स्वतः वार्ड कार्यालयात गेलेलो आहे.

श्री.त्रिंबक तुपे :कर्मचाऱ्यांची कमतरता असल्याने वार्ड इंजिनिअरच्या अधिपत्याखाली गुंठेवारीचे प्रकरणे निकाली काढण्यात यावे तसे अधिकार प्रदान करण्यात यावे. वार्ड स्तरावरच गुंठेवारीचे प्रकरणे निकाली काढण्यात यावे.

मा.सभापती : मागील दोन बैठकांपासून गुंठेवारी विषयाबाबत चर्चा चालु आहे, गुंठेवारी कक्ष प्रमुख यांना आदेश देवुनही संचिका निकाली काढण्यात आलेल्या नाहीत. त्यानुसार स.सदस्यांच्या भावना लक्षात घेऊन वार्ड इंजिनिअरच्या अधिपत्याखाली गुंठेवारीचे प्रकरणे निकाली काढण्यात यावे तसे अधिकार प्रदान करण्यात यावे.

श्री.संजय चौधरी :खुली जागा असल्याने गुंठेवारीचा प्रस्ताव नाकारला गेला, दिलीप गोपालराव म्हस्के, प्लॉट नंबर 73, हनुमाननगर गट नंबर 47 मध्ये खुल्या जागेवर गुंठेवारी मंजूर केलेली आहे.

श्री.त्रिंबक तुपे :वार्ड इंजिनिअर यांनी प्रत्यक्ष जागेवर जाऊन पाहणी करून प्रकरणे निकाली काढण्यात यावे.

प्र.आयुक्त :सभागृहाने केलेल्या मागणीनुसार गुंठेवारी विभाग हा वार्ड इंजिनिअर यांचेकडे असला पाहिजे व त्यांच्या पातळीवरच प्रकरणांचा निपटारा झाला पाहिजे. या गोष्टींशी सहमत आहे. संपुर्ण छाननी ही डेप्युटी इंजिनिअर लेवलवर होते, गुंठेवारी कक्षामध्ये गुंठेवारी कक्षप्रमुख म्हणुन डेप्युटी इंजिनिअर आहेत. वार्ड इंजिनिअर हे डेप्युटी इंजिनिअर कॅडरमधील आहे. त्यांची शैक्षणिक पात्रता व अनुभव पाहता वार्ड लेवलवर संचिका निकाली काढणे योग्य होईल. वार्ड लेवलवर करता येईल. अशा प्रकारचा प्रस्ताव मा.आयुक्त महोदय यांचेकडे सादर करून पुढील कार्यवाही करण्यात येईल.

श्री.सुरेंद्र कुलकर्णी :कुत्र्यांचा सुळसुळाट शहरात वाढलेला आहे, रोज छोटेमोठे अपघात होत आहे, शाळकरी मुलांना, लहान मुलांवर मोकाट कुत्र्यांच्या चावा मुळे त्रस्त आहेत, त्याचा बंदोबस्त करण्यात यावा.

श्री.मीर हिदायत अली :आजपर्यंत खाजगी एजन्सीने किती शहरातील किती कुत्र्यांची नसबंदी केली आहे हे एक प्रश्नचिन्ह आहे. कारण दिवसेंदिवस कुत्र्यांची संख्या कमी होण्याऐवजी वाढतच आहे. नसबंदी न करता बिलाची उचलना केली जाते. कुत्रे पकडण्यासाठी विभागाकडे वाहन नाही सक्षम कर्मचारी उपलब्ध नाही.

श्री.त्रिंबक तुपे :कुत्रे पकडण्याची निश्चित अशी वेळ नाही. दूपारनंतर कुत्रे दिसुन येत नाही. कुत्रे पकडल्यानंतर कुत्रे कुठे सोडले जातात.

पशुसंवर्धन अधिकारी :गेल्या वर्षी कुत्र्याच्या बाबतीत सभागृहात चर्चा होऊन निर्णय झाला होता की, वाहनांची संख्या वाढविण्यात यावी व कर्मचारी अधिकचे देण्यात यावे याबाबत वारंवार पाठपुरावा केलेला आहे, परंतु आजपर्यंत सदरील मागणी पुर्ण झालेली नाही, तसेच सध्या असलेले कर्मचारी यांचे वय वाढलेले असल्यामुळे कामाच्या गतीमध्ये अडचणी येत आहे. कुत्रे पकडल्यानंतर कुत्र्यांची नसबंदी केली जाते, खराब कुत्रें, पिसाळलेले कुत्रे नियमानुसार मारता येतात व कायद्यानुसार नियमानुसार ज्या ठिकाणाहुन कुत्रे पकडलेले आहे त्याच ठिकाणी पुन्हा त्या कुत्र्यांना सोडण्यात येते.

मा.सभापती :सर्व स.सदस्यांची भावना लक्षात घेऊन अधिकचे कर्मचारी उपलब्ध करून देण्यात यावे तसेच खाजगी कर्मचारी/एजन्सीच्या माध्यमातुन काम करून कुत्र्यांचा सुळसुळाट कमी करण्याबाबत योग्य ते नियोजन करण्यात यावे.

मा.सभापती :अतिक्रमण विभागाची जबाबदारी वार्ड कार्यालयावर टाकण्यात आलेली होती, त्या

ऐवजी मुख्यालयात प्रशासकीय विभागाअंतर्गत काम करण्यासंदर्भात आदेश दिलेले होते, त्याबाबत खुलासा करण्यात यावा.

उपआयुक्त (सिडको) :दिलेल्या आदेशानुसार मुख्यालयातुन सर्व काम चालु झालेले आहे. दोन अधिकारी यांचे नेमणुक केलेली आहे. श्री.अजमत खान आणि श्रीमती प्रियंका केसरकर यांचेकडे काम सोपविण्यात आलेले आहे. तसेच अतिक्रमण विभाग प्रमुख म्हणुन श्री.शिवाजी झनझन यांना कार्यभार देण्यासंदर्भात कार्यवाही केलेली आहे.

श्री.जगदिश सिध्द :1124 कर्मचारी यांचे सेवापुस्तक देण्यासंदर्भात चर्चा झालेली आहे. परिविक्षाधिन कालावधी केव्हा खुला करणार आहे. काही कर्मचारी सेवानिवृत्त झालेले आहे तरीही परिविक्षाधिन कालावधी खुला केलेला नाही. त्यामुळे कर्मचारी शासनाच्या अनेक सोयी सवलतीपासून वंचित आहे.

मा.सभापती :मा.आयुक्त यांनी प्रकरणाचा खुलासा करावा.

प्र.आयुक्त :1124 पैकी 562 कर्मचाऱ्यांचा परिविक्षाधिन कालावधी खुला करून सेवापुस्तीका देण्यात आलेल्या आहेत. 560 कर्मचाऱ्यांचे सेवापुस्तीका देण्याचे काम प्रशासनाने अनेक वेळा हाती घेतलेले आहे. मा.आयुक्त महोदय यांचे आदेशान्वये कर्मचाऱ्यांना सेवापुस्तीका देणे व परिविक्षाधिन कालावधी खुला करणे संदर्भात दोन समिती उपआयुक्त (प्र) यांच्या अधिपत्याखाली गठीत करण्यात आल्या आहेत. पथक प्रमुख-1, श्री.महाविर पाटणी व पथक प्रमुख-2 श्रीमती रोषण मकवाणे यांचेकडे काम सोपविण्यात आलेले आहे. मा.आयुक्तांशी समितीमार्फत वारंवार चर्चा झालेली आहे. मा.उच्च न्यायालयाकडील कर्मचाऱ्यांची जेष्ठता यादी मध्ये जे नांव आहे आणि मुळ आदेशामध्ये जे नांव आहे त्याची तपासणी करायची आणि दैनिक वेतनावर 2003 पुर्वी कर्मचारी यांनी काम केलेले असेल त्यांच्या पे बील मधुन वडीलांचे नांव कर्मचाऱ्यांचे नांव आडनांव एकत्र आहे काय? याचा मुळ रेकॉर्ड तपासुन तीन्ही रेकॉर्ड मॅच झाल्यास अशा कर्मचाऱ्यांचा परिविक्षाधिन कालावधी खुला करण्याचा निर्णय मा.आयुक्तांनी घेतलेला आहे. 40 ते 45 कर्मचाऱ्यांचा रेकॉर्ड मिळालेला आहे त्यास मा.आयुक्तांनी मंजुरी दिलेली आहे. प्रशासनाने परिविक्षाधिन कालावधी खुला करण्याचे तसे आदेश अद्यापपर्यंत काढलेले नाहीत. याबाबत तात्काळ आदेश काढण्यात येईल. तसेच उर्वरित कर्मचाऱ्यांचे परिविक्षाधिन कालावधी खुला करण्याचा प्रश्न आहे त्या कर्मचाऱ्यांचा मुळ रेकॉर्ड, दस्ताऐवज बघितल्यानंतर कर्मचाऱ्यांचा परिविक्षाधिन कालावधी खुला करण्याची कार्यवाही करण्यात येईल.

श्री.जगदिश सिध्द :काही कर्मचारी सेवानिवृत्त झालेले आहेत.

प्र.आयुक्त :जे कर्मचारी सेवानिवृत्त झालेले आहेत, त्यांना सेवाविषयक सर्व फायदे, कर्मचाऱ्यांना देण्यात येत आहे. त्यांचे कुठल्याही सोयींची अडवणुक केलेली नाही.

श्री.जगदिश सिध्द :ज्या दोन समिती गठीत केल्या होत्या त्यात मा.आयुक्त यांनी स्पष्ट केले होते की, दोन वेतनवाढी थांबवुन सेवापुस्तीका आठ दिवसांत देण्याबाबत, परिविक्षाधिन कालावधी खुला करणे ईत्यादी सर्व कार्यवाही करण्यात यावी म्हणुन आदेशित केले होते. तरीही प्रशासनाकडुन विलंब का होत आहे.

प्र.आयुक्त :महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 54(1) अन्वये आस्थापना समिती गठीत करून समिती समोर प्रकरणे ठेवुन समितीने दिलेल्या निर्णयानुसार कार्यवाही चालु आहे. समितीला मा.आयुक्त महोदय यांची मंजूरी आवश्यक आहे.

श्री.जगदिश सिध्द :दिनांक 04.01.2014 रोजी मा.आयुक्त महोदय यांनी आदेश काढले की, दोन पथक निर्माण करून दहा दिवसांमध्ये सर्व कार्यवाही करण्याबाबत सांगण्यात आले होते. (स.सदस्य श्री.जगदिश सिध्द सभागृहाला दिनांक 04.1.2014 चे मा.आयुक्तांचे आदेशाचे वाचन करून दाखवतात.) चार महिने विलंब झालेला आहे. कार्यवाही थांबलेली आहे.

प्र.आयुक्त :सन 2004 ला 1124ची भरती झालेली आहे आज जवळपास दहा वर्षाचा कालावधी झालेला आहे. प्रकरणामध्ये बरेचशा अधिकारी यांनी चौकशी केलेल्या आहेत. अधिकारी कर्मचारी यांना निलंबित,बडतर्फ करण्यात आलेले आहे पुन्हा कामावर घेण्यात आलेले आहेत. परिविक्षाधिन कालावधी एका वर्षासाठी असतो एका वर्षामध्ये खुला करणे आवश्यक आहे. परंतु सन 2004 पासून आजपर्यंत परिविक्षाधिन कालावधी खुला केलेला नाही. प्रशासनाने याबाबत सकारात्मक विचार करून समिती गठीत करून कार्यवाही करण्यात येत आहे. प्रशासनाकडुन सकारात्मकदृष्टया प्रश्न सोडविण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहे.

श्री.जगदिश सिध्द :विलंब जास्त झालेला आहे. प्रशासनाने तात्काळ सकारात्मक निर्णय घेऊन प्रश्न मार्गी लावण्यात यावे.

प्र.आयुक्त :सदरील कर्मचाऱ्यांचा प्रश्न लवकरात लवकर निकाली काढण्याचा प्रयत्न केला जाईल.

मा.सभापती :1124 भरती प्रकरणातील कर्मचाऱ्यांचा परिविक्षाधिन कालावधी खुला करणे व सेवापुस्तीका देण्याचा विषय सभागृहामध्ये मांडलेला आहे. प्रशासनाने तात्काळ हा प्रश्न मार्गी लावण्याबाबत सकारात्मकदृष्टया विचार करून योग्य ती कार्यवाही करण्यात यावी. पुढील बैठकीमध्ये माहिती देण्यात यावी .

श्री.मीर हिदायत अली :2 लाख 43 हजार घरांपर्यंत आरोग्य विभागाच कर्मचारी डेंग्यु आजारावरील मोहिमेकरीता पोहचलेले आहे. 30 टक्के घरांपर्यंत पोहचण्याचे काम बाकी असल्याबाबत आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांनी खुलासा केलेला आहे. महानगरपालिकेचे हित लक्षात घेऊन ज्या मालमत्तांना टॅक्स लागलेला नाही. त्या मालमत्तांना टॅक्स लागला पाहिजे.

मा.सभापती :स.सदस्य श्री.मीर हिदायत अली यांनी सभागृहामध्ये डॉ.संध्या टाकळीकर, आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांनी डेंग्यु नियंत्रणासाठी नियोजनात्मक काम केल्यामुळे सभागृहातर्फे त्यांचे अभिनंदन करावे असा प्रस्ताव मांडला आरोग्य वैद्यकीय अधिकारी, डॉ.संध्या टाकळीकर यांनी शहरात डेंग्यु नियंत्रनासाठी चांगले काम केलेले आहे. त्यांचे सभागृहातर्फे अभिनंदन करण्यात येते.

श्री.मीर हिदायत अली :महानगरपालिकेतील शिक्षकांचे वेतनवाढ थांबविण्यात आलेले आहे. वेतनवाढ थांबविता येतात का?

**<u>विषय क्र. 33 : मालमत्ता विभाग</u>**

(दि.19/7/2014 च्या सभेत स्थगित ठेवण्यात आलेला विषय क्र.11 अन्वये)

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मोहल्ला मोंढा नाका जालना रोड येथील सिटी प्राईड इमारतीमध्ये (न.भु.क्र.12877/ए/1या इमारतीमधील 25% बांधकाम समावेशक आरक्षण विकासातंर्गत विकसीत क्षेत्रापैकी महानगरपालिकेस हस्तांतरीत महानगरपालिकेच्या ताब्यात व मालकी हक्कात) आहे. ज्याचे क्षेत्रफळ 375 चौ.मी. एवढे असून सदरील हॉल श्री.राजेंद्र हिम्मतराव जंजाळ यांना एक वर्षाच्या मुदतीवर प्रतिमाह भाडे रू.82,200/- (याशिवाय इतर कर वेगळे) भाडे तत्वावर दिला होता. संबंधीताची मुदत संपली असल्याने पुढील मुदतवाढ

मिळणे बाबत विनंती केलेली आहे. त्यानुषंगाने सदरील हॉलसाठी यावर्षीचे सिध्द शिघ्र गणकानुसारचे प्रतिमाह भाडे रू.1,34,438/- या व्यतिरिक्त सेवाकर (12.36% वेगळा) तसेच मालमत्ता कर, सेवाशुल्क इत्यादी भरण्याच्या अटीनुसार एक वर्षाचे कालावधीसाठी भाडेतत्वावर देणे बाबत प्रशासकीय मान्यता झालेली आहे.

करीता समावेशक आरक्षण विकासातंर्गत बांधकामापैकी महानगरपालिकेस हस्तांतरीत व महानगरपालिकेच्या मालकी हक्कातील 25% बांधकाम असलेल्या 375 चौ.मी. क्षेत्राचा हॉल अर्जदार श्री.राजेंद्र हिम्मतराव जंजाळ यांना एक वर्षाचे कालावधी करीता प्रतिमाह भाडे रक्कम रू.1,34,438/- ने (याशिवाय इतर कर वेगळे) महानगरपालिकेच्या नेहमीच्या अटी शर्तीस अधिन राहुन देण्याचा प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

मा.सभापती :विषय क्रमांक 33 मंजूर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मोहल्ला मोंढा नाका जालना रोड येथील सिटी प्राईड इमारतीमध्ये (न.भु.क्र.12877/ए/1या इमारतीमधील 25% बांधकाम समावेशक आरक्षण विकासातंर्गत विकसीत क्षेत्रापैकी महानगरपालिकेस हस्तांतरीत महानगरपालिकेच्या ताब्यात व मालकी हक्कात) असलेली जागा क्षेत्रफळ 375 चौ.मी. चा हॉल श्री.राजेंद्र हिम्मतराव जंजाळ यांना एक वर्षाच्या मुदतीवर प्रतिमाह भाडे रू.82,200/-(याशिवाय इतर कर वेगळे) भाडे तत्वावर दिला असल्याने संबंधीताची मुदत संपल्यामुळे पुढील मुदतवाढ मिळणेसाठी संबंधीताने विनंती केल्याप्रमाणे, सदरील हॉलसाठी यावर्षीचे सिध्द शिघ्र गणकानुसारचे प्रतिमाह भाडे रू.1,34,438/- या व्यतिरिक्त सेवाकर (12.36% वेगळा) तसेच मालमत्ता कर, सेवाशुल्क इत्यादी भरण्याच्या अटीनुसार एक वर्षाचे कालावधीसाठी संबंधीतास भाडेतत्वावर देणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 34 : मालमत्ता विभाग**

( दि.19/7/2014 च्या सभेत स्थगित ठेवण्यात आलेला विषय क्र.19 अन्वये )

औरंगाबाद शहर / महानगरपालिका हद्दीत खालील नमुद विविध जाहीरात प्रकाराने होणाऱ्या जाहिराती करीता जाहिरात कर आकारणी करीताचे दर विविध प्रकारासाठी स्थान परत्वे वेगवेगळे असे आहे. सदरील दर मा.सर्वसाधारण सभा दि.28/02/2002 विषय क्र.578/8 ने मंजुर झालेले आहेत. सदरील दर वाढीसंबंधाने झालेल्या चर्चेसंबंधाने व महानगरपालिका जाहीरात धोरण निश्चित करण्यासंबंधी झालेल्या चर्चेनुसार शहरातील विविध जाहिरात प्रकारासाठी व शहराचे विविध भागासाठी जाहिरात कर आकारणीसाठी एकच दर आकारण्याचे प्रस्तावित करण्यात येत असुन सध्या वेगवेगळ्या दरापैकी साधारणतः जाहिरात फलक करीता जास्तीचे दर ज्याआधारे कर आकरणी करण्यात येते तो दर रू.53.58/चौ.मी. असा आहे. त्याऐवजी रू.75/- चौ.मी. आकारण्याचे प्रस्तावित करण्यात येत आहे. सदर प्रस्तावित दरास प्रशासकीय मान्यता होऊन त्या आधारे सदर दराने जाहीरात कर वसुली करीता वसुली अभिकर्ता नियुक्ती संबंधी निविदा कार्यवाही सुरू करण्यात आली आहे.

करीता उक्त दर व निविदा कार्यवाही यासंबंधीच्या कार्योत्तर मान्यतेस्तव प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

मा.सभापती : विषय क्रमांक 34 जाहिराती, होर्डीग वसुली संदर्भातील असुन सोलापूर, अहमदनगर, नांदेड, अकोला महानगरपालिकेकडून जाहीराती संबंधीचे दर मागवुन घेण्यात यावे व सुधारित प्रस्ताव पुढील स्थायी समिती सभेमध्ये ठेवण्यात यावा.

**ठराव :**

सभागृहात झालेल्या चर्चेप्रमाणे, औरंगाबाद शहर / महानगरपालिका हद्दीत विविध जाहीरात प्रकाराने होणाऱ्या जाहिराती करीता जाहिरात कर आकारणीच्या दराबाबत सोलापूर, अहमदनगर, नांदेड, अकोला महानगरपालिके जाहीराती संबंधीचे दर मागवुन घेण्यात यावे. त्याचा तुलनात्मकदृष्ट्या अभ्यास करून सुधारित प्रस्ताव पुढील स्थायी समिती समोर ठेवण्यात यावा. यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत आली. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 35 : लेखा परिक्षण विभाग**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे नियम 47 मधील नियम (1) चे (क) मधील तरतुदीनुसार मुख्य लेखापरीक्षक यांचे प्रदान अधिकारानुसार मुख्य लेखापरीक्षक प्रस्ताव सादर करतात की, श्री.सिद्दीकी नासेर लईख, सईद अहेमद वरीष्ठ लिपीक, लेखापरीक्षण विभाग यांनी त्यांचे स्वतःच्या अँजीओप्लास्टी सर्जरी करीता 2,47,822.27/- (अक्षरी रू.दोन लक्ष सत्तेचाळीस हजार आठशे बावीस पूर्णांक सत्तावीस) अग्रिम खर्च केलेला असून त्यांनी सादर केलेल्या वैद्यकीय खर्चाचे देयके एकूण रूपये 2,47,822.27/- त्यापैकी अनुज्ञेय रक्कम रू.2,47,146/- च्या 90% रक्कम रू.2,22,431/- (अक्षरी रू.दोन लक्ष बावीस हजार चारशे एकतीस) त्यापैकी एकत्रीत दाखल केलेला खर्च देयकाच्या 5% रक्कम रू.12,391/- (अक्षरी रू.बारा हजार तीनशे एक्क्यान्नव) मनपा फंडात जमा करून उर्वरीत रक्कम रू.2,10,040/- (अक्षरी रू.दोन लक्ष दहा हजार चाळीस) एवढा वैद्यकीय खर्चापैकी घेतलेले अग्रिम रू.1,50,000/- मनपा फंडात वळते करून उर्वरीत रक्कम रू.60,040/- इतकी अनुज्ञेय रक्कम संबंधीतास यापूर्वी मा.आयुक्त, महानगरपालिका, औरंगाबाद यांच्या मान्यतेने अदा करणेत आलेली आहे.

तसेच श्री.सिद्दीकी नासेर लईख, यांनी त्यांचे स्वतःच्या बायपास सर्जरी करीता स्वतः रक्कम रू.3,38,560/- (अक्षरी रू. तीन लक्ष अडोतीस हजार पाचशे साठ) खर्च केले असून त्यांनी सादर केलेल्या वैद्यकीय खर्चाची देयके एकुण रूपये 3,38,560/- सादर केले असून त्यापैकी अनुज्ञेय रक्कम रू.3,01,796/- च्या 90% रक्कम रू. 2,71,616.90 (अक्षरी दोन लक्ष एकाहत्तर हजार सहाशे सोळा पुर्णांक नव्वद) त्यापैकी एकत्रित दाखल केलेल्या खर्च देयकाच्या 05% रक्कम रू.16,928/- (सोळा हजार नऊशे अठ्ठावीस) मनपा फंडात जमा करून उर्वरीत रक्कम रू.2,54,688/- (अक्षरी दोन लक्ष चोपन्न हजार सहाशे अठ्ठ्यांशी) इतका वैद्यकीय खर्च केलेला आहे.

परि.क्र.1 व 2 मध्ये प्रस्तावित वैद्यकीय खर्च रक्कम रू.2,22,431+2,71,616 =4,94,047/- (अक्षरी चार लक्ष चौऱ्यान्नव हजार सत्तेचाळीस फक्त) इतक्या वैद्यकीय खर्चास मान्यता देण्यात येवून यापूर्वी अदा केलेली रक्कम वजा जाता आता रक्कम रू.2,71,616/- अदा करण्याबाबतचा प्रस्ताव विचारार्थ व मान्यतेस्तव सविनय सादर.

मा.सभापती :विषय क्रमांक 35 मंजूर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, श्री.सिद्दीकी नासेर लईख, सईद अहेमद वरीष्ठ लिपीक, लेखापरीक्षण विभाग यांनी त्यांचे स्वतःच्या अँजीओप्लास्टी सर्जरी या आजारावर केलेला परि.क्र.1 व 2 मध्ये प्रस्तावित वैद्यकीय खर्च रक्कम रू.2,22,431+2,71,616 =4,94,047/- (अक्षरी चार लक्ष चौऱ्यान्नव हजार सत्तेचाळीस फक्त) इतक्या वैद्यकीय खर्चास मान्यता देण्यात येते. तसेच यापूर्वी अदा केलेली रक्कम वजा जाता आता रक्कम रू.2,71,616/- अदा करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 36 : मालमत्ता विभाग**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, वॉर्ड क्र.35 अंतर्गत मोहल्ला कोहीनुर कॉलनी, कोतवालपुरा येथील महानगरपालिकेच्या ताब्यातील हॉल सचिव, कोहीनुर बहुउद्देशीय सेवाभावी संस्था या संस्थेने भाडेतत्वावर मिळणेसाठी विनंती केली आहे. सदरील हॉलचे क्षेत्रफळ 104 चौ.मी. असून सन 2014 च्या सिध्द शिघ्र गणकानुसारचे भाडे रू.26700/- प्रतिमाह (इतर कर वेगळे) एवढे होते. तथापी सदरील हॉलचे बांधकाम हे 15 वर्षापूर्वीचे असून महानगरपालिकेच्या मंजूर धोरणानुसार मा.स्थायी समिती ठरवेल त्याप्रमाणे भाडे निश्चिती करून सदर हॉल तीन वर्ष कालावधी करीता भाडेतत्वावर देणेसाठी प्रशासकीय मान्यता झालेली आहे.

तसेच यापूर्वी मा.स्थायी समिती सभा दिनांक 28/02/2014 रोजी संपन्न झालेल्या बैठकीतील पारीत झालेल्या ठराव क्र.216 अन्वये ज्या हॉलचे बांधकाम पंधरा वर्ष किंवा त्याहून जास्त कालावधीचे असल्यास मनपाच्या मालमत्तेचे जतन, संरक्षण व्हावे तसेच मनपास काही प्रमाणात महसूल मिळावा या दृष्टीकोनातून सदर हॉल, इमारत यांचे मेंटेनन्स व लाईट बिलाचा खर्च संबंधीत संस्थेने करण्याच्या अटीवर आर.आर. दराच्या 10%

ते 20% दराआधारे भाडे निश्चित करून भाडेतत्वावर देण्याबाबतचे धोरण ठरविण्यात आले आहे.

मा.स्थायी समितीच्या वर नमुद केलेल्या धोरणानुसार सचिव, कोहीनुर बहुउद्देशीय सेवाभावी संस्था या संस्थेस सदरील हॉल महानगरपालिकेच्या नेहमीच्या अटी शर्तीस अधीन राहुन भाडेतत्वावर देण्याचा प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

संवाद :

श्री.रवि कावडे : सदर हॉलचे बांधकाम पंधरा वर्षापुर्वीचे असून 15 वर्षापेक्षा जास्त काळापासून विनावापर पडून आहे. मा.स्थायी समिती सभा दिनांक 28/02/2014 रोजीच्या बैठकीतील ठराव क्र.216 च्या धोरणाप्रमाणे अटीवर 10% दराआधारे भाडे निश्चित करून मनपाच्या मालमत्तेचे संरक्षण होण्याच्या दृष्टीने मेन्टेनन्स व लाईट बीलाचा खर्च संस्थेने करावा, संस्थेने नियमित भाडे भरल्यास पाच अधिक पाच वर्ष असे दहा वर्षासाठी देण्यात यावे.

मा.सभापती : प्रस्तावात नमुद केल्यानुसार व सन्माननीय सदस्यानी या प्रकरणात सूचना मांडल्याप्रमाणे पंधरा वर्षापेक्षा जास्त काळापासून विनावापर पडून असलेल्या मनपाच्या मालमत्तेचे जतन, संरक्षण व्हावे तसेच मनपास काही प्रमाणात महसूल मिळावा या दृष्टीकोनातून सदर हॉल, इमारत यांचे मेंन्टेनन्स व लाईट बिलाचा खर्च संबंधीत संस्थेने करण्याच्या अटीवर आर.आर.च्या 10% दरा आधारे भाडे निश्चित करून पाच अधिक पाच वर्ष कालावधीसाठी देण्यात यावे. पहिल्या पाच वर्षाच्या कालावधीत संस्थेने नियमित भाडे भरणा केल्यास पुढील पाच वर्ष असे एकूण दहा वर्ष कालावधीसाठी भाडेतत्वावर देण्यास मंजुरी देण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व सभागृहात झालेल्या चर्चेनुसार मोहल्ला कोहीनुर कॉलनी, कोतवालपुरा येथील महानगरपालिकेच्या ताब्यातील हॉलचे बांधकाम पंधरा वर्षापुर्वीचे आहे. महानगरपालिकेच्या मालमत्तेचे जतन, संरक्षण व्हावे तसेच मनपास काही प्रमाणात महसूल मिळावा म्हणून स्थायी समिती ठराव क्र.216 दि.28/2/2014 च्या धोरणाप्रमाणे मनपाच्या हिताच्या दृष्टीने सदर हॉल/इमारतीचे मेन्टेनन्स व लाईट बीलाचा खर्च संस्थेने करण्याच्या अटीवर आर.आर.दराच्या 10% दराआधारे भाडे निश्चित करून सचिव, कोहीनुर बहुउद्देशीय सेवाभावी संस्था या संस्थेस पाच + पाच असे एकूण दहा वर्षासाठी देण्यास आणि पहिल्या पाच वर्षाच्या कालावधीत संस्थेने नियमित भाडे भरणा केल्यास पुढील पाच वर्ष कालावधीसाठी मुदतवाढ देऊन भाडेतत्वावर देण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 37 : मालमत्ता विभाग**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, मोहल्ला चिकलठाणा अंतर्गत कुरेशी गल्ली येथील महानगरपालिकेच्या ताब्यातील हॉल नर्मदेश्वर बहुउद्देशीय विकास मंडळ या संस्थेने भाडेतत्वावर मिळणेसाठी विनंती केली आहे. सदरील हॉलचे क्षेत्रफळ 78.65 चौ.मी. असून सन 2014 च्या सिध्द शिघ्र गणकानुसारचे भाडे रू.19700/- प्रतिमाह (इतर कर वेगळे) एवढे होते. तथापी सदरील हॉलचे बांधकाम हे 15 वर्षापूर्वीचे असून महानगरपालिकेच्या मंजूर धोरणानुसार मा.स्थायी समिती ठरवेल त्याप्रमाणे भाडे निश्चिती करून सदर हॉल तीन वर्ष कालावधी करीता भाडेतत्वावर देणेसाठी प्रशासकीय मान्यता झालेली आहे.

तसेच यापूर्वी मा.स्थायी समिती सभा दिनांक 28/02/2014 रोजी संपन्न झालेल्या बैठकीतील पारीत झालेल्या ठराव क्र.216 अन्वये ज्या हॉलचे बांधकाम पंधरा वर्ष किंवा त्याहून जास्त कालावधीचे असल्यास मनपाच्या मालमत्तेचे जतन, संरक्षण व्हावे तसेच मनपास काही प्रमाणात महसूल मिळावा या दृष्टीकोनातून सदर हॉल, इमारत यांचे मेंटेनन्स व लाईट बिलाचा खर्च संबंधीत संस्थेने करण्याच्या अटीवर आर.आर. दराच्या 10% ते 20% दराआधारे भाडे निश्चित करून भाडेतत्वावर देण्याबाबतचे धोरण ठरविण्यात आले आहे.

मा.स्थायी समितीच्या वर नमुद केलेल्या धोरणानुसार नर्मदेश्वर बहुउद्देशीय विकास मंडळ या संस्थेस सदरील हॉल महानगरपालिकेच्या नेहमीच्या अटी शर्तीस अधीन राहुन भाडेतत्वावर देण्याचा प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

संवाद :

श्री.रवि कावडे : चिकलठाणा येथील सदर हॉलचे बांधकाम पंधरा वर्षापुर्वीचे असून 15 वर्षापेक्षा जास्त काळापासून विनावापर पडून आहे. मा.स्थायी समिती सभा दिनांक 28/02/2014 रोजीच्या बैठकीतील ठराव क्र.216 च्या धोरणाप्रमाणे अटीवर 10% दराआधारे भाडे निश्चित करून मनपाच्या मालमत्तेचे संरक्षण होण्याच्या दृष्टीने मेन्टेनन्स व लाईट बीलाचा खर्च संस्थेने करावा, संस्थेने नियमित भाडे भरल्यास पाच अधिक पाच वर्ष असे दहा वर्षासाठी देण्यात यावे.

मा.सभापती : प्रस्तावात नमुद केल्यानुसार व सन्माननीय सदस्यानी या प्रकरणात सूचना मांडल्याप्रमाणे पंधरा वर्षापेक्षा जास्त काळापासून विनावापर पडून असलेल्या मनपाच्या मालमत्तेचे जतन, संरक्षण व्हावे तसेच मनपास काही प्रमाणात महसूल मिळावा या दृष्टीकोनातून सदर हॉल, इमारत यांचे मेंन्स्टेनन्स व लाईट बिलाचा खर्च संबंधीत संस्थेने करण्याच्या अटीवर आर.आर.च्या 10% दराआधारे भाडे निश्चित करून पाच अधिक पाच वर्ष कालावधीसाठी देण्यात यावे. पहिल्या पाच वर्षाच्या कालावधीत संस्थेने नियमित भाडे भरणा केल्यास पुढील पाच वर्ष असे एकूण दहा वर्ष कालावधीसाठी भाडेतत्वावर देण्यास मंजुरी देण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व सभागृहात झालेल्या चर्चेनुसार मोहल्ला चिकलठाणा अंतर्गत कुरेशी गल्ली येथील महानगरपालिकेच्या ताब्यातील हॉलचे बांधकाम पंधरा वर्षापुर्वीचे आहे. महानगरपालिकेच्या मालमत्तेचे जतन, संरक्षण व्हावे तसेच मनपास काही प्रमाणात महसूल मिळावा म्हणून स्थायी समिती ठराव क्र.216 दि.28/2/2014 च्या धोरणाप्रमाणे मनपाच्या हिताच्या दृष्टीने सदर हॉल/इमारतीचे मेन्टेनन्स व लाईट बीलाचा खर्च संस्थेने करण्याच्या अटीवर आर.आर.दराच्या 10% दराआधारे भाडे निश्चित करून नर्मदेश्वर बहुउद्देशीय विकास मंडळ या संस्थेस पाच + पाच असे एकूण दहा वर्षासाठी देण्यास आणि पहिल्या पाच वर्षाच्या कालावधीत संस्थेने नियमित भाडे भरणा केल्यास पुढील पाच वर्ष कालावधीसाठी मुदतवाढ देऊन भाडेतत्वावर देण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 38 : शिक्षण विभाग**

शिक्षण विभागामार्फत सन 2014-2015 या शैक्षणिक वर्षात एकुण 78 शाळेतील इयत्ता बालवाडी ते दहावी पर्यंत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी शालेय गणवेश खरेदीसाठी प्रती विद्यार्थी रू.400/- (ज्यात-दोन गणवेश खरेदी व शिलाई समाविष्ठ) अशाप्रमाणे एकूण 8706 विद्यार्थ्यांना एकूण रक्कम रू.34,82,400/- (अक्षरी रू.चौतीस लक्ष ब्याऐंशी हजार चारशे मात्र) खर्च अपेक्षित आहे. सदर खर्च हा डॉ.बाबासाहेब आंबेडकर गणवेश सहाय्य योजनेअंतर्गत करण्यात येईल.

| अ.क्र. | वर्ग | एकूण विद्यार्थी संख्या |
|---|---|---|
| 1 | बालवाडी वर्ग | 2908 |
| 2 | इयत्ता पहिली ते आठवी (स.शि.अ. लाभार्थी व्यतिरिक्त) | 4588 |
| 3 | इयत्ता नववी ते दहावी | 1210 |
| | **एकुण** | 8703 |

सदर दर्शविलेले लाभार्थी हे सर्वशिक्षा अभियान योजना व्यतिरिक्त लाभार्थी आहे. तथा सदर गणवेश खरेदीसाठी, शालेय व्यवस्थापन समिती मार्फत मुख्याध्यापकांच्या नांवे प्रत्यक्ष शाळेतील विद्यार्थ्यांच्या उपस्थिती संख्येनुसार प्रति विद्यार्थी रू.400/- प्रमाणे धनादेश स्वरूपात निधी वितरण करण्यात येईल. सदर निधीचा विनियोग खालील दिलेल्या निर्देशानुसार करावयाचा आहे.

1. गणवेशाकरीता कापडाची खरेदी शाळा व्यवस्थापन समितीने करावी. सदर कापडाची खरेदी करतांना कोणत्याही राज्य / केंद्र शासनाच्या सहकारी संस्था, राष्ट्रीय वस्त्रोद्योग संस्था किंवा इतर संस्था यांना प्राधान्य देण्यात येवू नये.
2. शाळांनी गणवेश कापडाच्या खरेदीसाठी कमीत कमी तीन पुरवठादारांसाठी अटी व शर्तीसह दरपत्रके मागवावीत. शाळांनी दरपत्रके मागवितांना त्यामध्ये कापडांचे विवरण (Discription), वैशिष्ट्ये (Specification), रंग (Colour), मुले व मुलींसाठी वेगवेगळे नग (Quantity) व पुरवठा कालावधी नमूद करावा.
3. शाळा व्यवस्थापन समितीस कापडाची वैशिष्ट्ये (Specification) माहित नसल्यास दरपत्रके मागवितांना आवश्यक असलेल्या गणवेश कापडाचा नमुना पुरवठादारास पाठवावा व त्यानुसार दरपत्रके मागवावीत.
4. दरपत्रके मागविण्याचा कालावधी पुर्ण झाल्यावर शाळा व्यवस्थापन समितीने दरपत्रके उघडून अटी व शर्ती पूर्ण करणार व कमीत कमी दर ज्या पुरवठादाराचे असतील त्या पुरवठादारास कापड पुरवठा करण्याकामी पुरवठा आदेश निर्गमित करावा.
5. प्रत्येक शाळा व्यवस्थापन समितीने त्यांच्या शाळेतील पात्र लाभार्थ्यांच्या वयोगटानुसार व विद्यार्थ्यांच्या मापानुसार (Size प्रमाणे) मुलांसाठी व मुलींसाठी लागणाऱ्या कापडाची यादी तयार करून कापडाची खरेदी करावी.
6. कापडाची शिलाई करणेकामी संबंधीत शाळा व्यवस्थापन समितीने अटी व शर्तीसह दरपत्रके मागवावीत. गणवेश कापड व शिलाई यासाठी मंजूर तरतुदीच्या अधीन राहून वेगवेगळी दरपत्रके मागवावीत.
7. गणवेश कापड व शिलाई यांच्या देयकाची अदायगी संबंधीत शाळा व्यवस्थापन समितीने धनादेशाद्वारे करावी. रोख स्वरूपात अदायगी करू नये.
8. शाळा स्तरावर दिनांक निहाय संपूर्ण हिशोब ठेवण्यात यावा.
9. गणवेश शिवून झाल्यानंतर त्याची तांत्रिक समितीद्वारे तपासणी करून घेण्यात यावी. त्यांचा योग्य अहवाल प्राप्त झाल्यानंतर मंजूर तरतुदीमधील रक्कम शिल्लक असल्यास, सदर रक्कम त्याच आर्थिक वर्षात मनपा स्तरावर जमा करावी व विनियोग प्रमाणपत्र सादर करून त्याचे रेकॉर्ड ठेवण्यात यावे.

करीता वरील प्रमाणे डॉ.बाबासाहेब आंबेडकर गणवेश सहाय्य योजनेतून गणवेश खरेदीसाठी अनुदान निधी देण्यासाठी प्रस्ताव विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

मा.सभापती :विषय क्रमांक 38 मंजूर.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सन 2014-2015 या शैक्षणिक वर्षात मनपाच्या 78 शाळेतील इयत्ता बालवाडी ते दहावी पर्यंत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी शालेय गणवेश खरेदीसाठी प्रती विद्यार्थी रू.400/- (ज्यात-दोन गणवेश खरेदी व शिलाई समाविष्ठ) अशाप्रमाणे एकूण 8706 विद्यार्थ्यांना डॉ.बाबासाहेब आंबेडकर गणवेश सहाय्य योजनेतून गणवेश खरेदीसाठी अनुदान निधी देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 39 : एलबीटी विभाग**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, दि.01/10/2013 ते दि.30/09/2014 या कालावधीमध्ये औरंगाबाद महानगरपालिका हद्दीत मालाचे वाहन आयात केलेल्या ठिकाणापासून निर्यात होणाऱ्या मार्गस्थ मालाच्या प्रति वाहनावर रहदारी फी (पारगमन शुल्क) रू.100/- वसूल करण्यासाठी महानगरपालिका अधिनियमातील तरतुदींचा वापर करून मा.स्थायी समितीचा ठराव क्र.58 दि.24/09/2013 अन्वये मान्यता दिल्यानुसार मे.सहकार ग्लोबल लि., मालाड (प.) मुंबई या संस्थेस "रहदारी फी संकलन अभिकर्ता" म्हणुन कार्यादेश क्र.मनपा/रहदारी/2013/404 दि.30/09/2013 अन्वये नियुक्ती करण्यात आलेली आहे.

औरंगाबाद पैठण रोड वरील कांचनवाडी या गावाच्या हद्दीपासून नगररोडकडे जाण्यासाठी 'पैठण लिंक रोड' शासनामार्फत नव्याने सुरू करण्यात आलेला आहे. 'पैठण लिंक रोड' नव्याने सुरू झाल्याने औरंगाबाद-नगर रोडवरील गोलवाडी रहदारी फी वसूली नाक्यावरील रहदारी फी वसूलीवर परिणाम होत असल्यामुळे अभिकर्त्याने त्यांचे प्रतिदिन रू.50 ते 60 हजाराचे नुकसान होत असल्याचे पत्राद्वारे कळवून त्यांना पैठण रोडवरील सेंट जॉन शाळेसमोर गट नं.40 कांचनवाडी मधुन नगर रोडकडे जाणाऱ्या बायपास रोड कांचनवाडी येथे रहदारी फी वसूलीचा नाका बसविण्याची परवानगी देण्यात यावी, अशी विनंती केलेली आहे. संबंधीत अभिकर्त्यासोबत करण्यात आलेल्या प्रचलित करारनाम्यातील अट क्र.5 मध्ये नमूद केल्यानुसार उक्त कालावधीमध्ये नव्याने नाका उभारणे व इतर अनुषंगिक व्यवस्था ही संबंधीत अभिकर्त्याने स्वखर्चाने करावी असे नमुद आहे.

करिता मे.सहकार ग्लोबल लि., यांच्या विनंतीप्रमाणे नव्याने तयार झालेल्या पैठण लिंक रोड वरील कांचनवाडी येथील टी-पॉईट वर प्रचलित करारनाम्यामधील अटी/शर्तीच्या अधिन राहुन औरंगाबाद महानगरपालिका हद्दीतील जागेवर नाका उभारणी करण्याच्या परवानगीकरीता प्रस्ताव विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

मा.सभापती :विषय क्रमांक 39 मंजूर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे दि.01/10/2013 ते दि.30/09/2014 या कालावधीमध्ये रहदारी फी (पारगमन शुल्क) रू.100/- वसूलीसाठी नियुक्ती केलेले "रहदारी फी संकलन अभिकर्ता" मे.सहकार ग्लोबल लि., मालाड (प.) मुंबई यांच्या विनंतीप्रमाणे नव्याने तयार झालेल्या पैठण लिंक रोड वरील कांचनवाडी येथील टी-पॉईट वर पैठण रोडवरील सेंट जॉन शाळेसमोर गट नं.40 कांचनवाडी मधुन नगर रोडकडे जाणाऱ्या बायपास रोड कांचनवाडी येथे रहदारी फी वसूलीचा नाका प्रचलित करारनाम्यामधील अटी/शर्तीच्या अधिन राहुन औरंगाबाद महानगरपालिका हद्दीतील जागेवर नाका उभारणी करण्यास मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 40 : कर्मचारी अपील**

श्री.संतोष शंकरराव जाधव (निलंबीत शिपाई), कर आकारणी विभाग, मनपा औरंगाबाद यांनी जा.क्र.मनपा/आस्था-2/2013/1872 दि.3/10/2013 च्या निलंबन आदेशाविरूध्द स्थायी समितीकडे सादर केलेल्या अपीलावर विचारविनिमय करून निर्णय घेणे.

**संबंधीताने सादर केलेले अपील खालीलप्रमाणे**

वरील विषयी आपल्या सेवेशी विनंती अर्ज सादर करीत आहे की, संदर्भीय कार्यालयीन आदेशान्वये मला निलंबीत करण्यांत आलेले आहे. सद्यस्थितीत माझे प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

परंतु माझी आर्थीक परिस्थिती हलाखीची असल्यामुळे, मला मिळणारे वेतन फारच कमी आहे. त्यामुळे घरातील असलेली जबाबदारी मला पार पाडणे शक्य होत नाही. मा.न्यायालयाच्या निर्णयाच्या अधिन राहुन माझे निलंबन रद्द करून मला पुर्ववत कामावर घेण्यात यावे. करीता मी मा.स्थायी समितीकडे अपील सादर करीत आहे. कृपया माझ्या अपीलावर निर्णय घेऊन मला कामावर हजर करून घ्यावे. मा.स्थायी समिती सभेसमोर अपील सादर करण्यांत येत आहे. ही नम्र विनंती.

मा.सभापती :विषय क्रमांक 40 स्थगीत ठेवण्यांत येतो. ऐनवेळचे विषय मंजूर.

**ठराव :**

सभागृहात झालेल्या चर्चेनुसार सदर प्रस्ताव तुर्त स्थगित ठेवण्यात येतो.

ऐनवेळचे विषय

**विषय क्र. 41 : मालमत्ता विभाग**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महानगरपालिकेच्या मालकीचे मोहल्ला हडको एन-11 येथील कै.पुंडलिकराव ताठे मंगल कार्यालय/सभागृह व त्यासमोरील खुली जागा असा एकत्रित परिसर निकीता सुशिक्षित बेरोजगार सेवा सहकारी संस्था यांनी भाडेतत्वावर चालविणेसाठी विनंती अर्ज करून मागणी केलेली आहे. सदरील सभागृह/मंगल कार्यालयाचा लग्न सराईत लग्न समारंभासाठी मर्यादीत वापर होतो. त्यापासून मागील तीन वर्षाचे सरासरी वार्षिक उत्पन्न 9.00 लक्ष एवढे होते.

सदर ठिकाणी मनपाचे कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांचे वेतनापोटी वार्षिक 5,28,000/- एवढा खर्च होतो. वार्षिक विद्युत देयक 1,20,422/- एवढे असून नियमित देखभाल दुरूस्तीवरील खर्च इत्यादी वगळता महानगरपालिकेस वार्षिक उत्पन्न अत्यंत अल्प प्रमाणात आहे. निकीता सुशिक्षित बेरोजगार सेवा सहकारी संस्था यांनी मागणी केल्याप्रमाणे उक्त कार्यवाहीस प्रशासकीय मान्यता झालेली आहे.

त्या अनुषंगाने सदरील हॉल व त्यासमोरील जागेकरीता सिध्द शिघ्र गणकाच्या दरानुसारचे भाडे 2,66,000/- एवढे होते. अपेक्षित वार्षिक भाडे 31,92,000/- होते. त्या अनुषंगाने 365 दिवसांचे प्रति दिन 8745/- एवढे होते. त्यानुसार वार्षिक सरासरी 120 दिवसांचे आरक्षण गृहीत धरून वार्षिक भाडे रू.10,49,400/- त्यानुसार मासिक भाडे रू.87,450/- एवढे होते. तसेच 120 दिवसांपेक्षा जास्तीचे आरक्षण झाल्यास त्यापासून मिळणाऱ्या अतिरिक्त उत्पन्नापैकी 50% रक्कम मनपास द्यावी लागेल. यासह मनपाच्या नेहमीच्या अटी शर्तीस अधीन राहून कै.पुंडलिकराव ताठे मंगल कार्यालय/सभागृह व त्यासमोरील खुली जागा तीन वर्षासाठी भाडेतत्वावर देण्याचा प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

मा.सभापती : प्रस्तावात नमुद केल्साप्रमाणे कर्मचाऱ्यांचे वेतन, विद्युत देयकावरील खर्च, मेन्टेनन्स खर्च इत्यादी बाबींवर होणाऱ्या खर्चाच्या प्रमाणात मिळणाऱ्या उत्पन्न यांची तुलना केल्यास संस्थेस भाडेतत्वावर चालविणेसाठी दिल्यास मनपास फायदेशीर आहे. पाच वर्षासाठी देण्यात यावे. या कालावधीत संस्थेने नियमित भाडे भरणा केल्यास पुढील पाच वर्ष मुदतीसाठी भाडेतत्वावर देण्यास मंजुरी देण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महानगरपालिकेच्या मालकीचे मोहल्ला हडको एन-11 येथील कै.पुंडलिकराव ताठे मंगल कार्यालय/सभागृह व त्यासमोरील खुली जागा असा एकत्रित परिसर निकीता सुशिक्षित बेरोजगार सेवा सहकारी संस्था यांनी भाडेतत्वावर चालविणेसाठी मागणी केल्यानुसार तसेच प्रस्तावात नमुद केलेला कर्मचाऱ्यांचे वेतन, विद्युत देयकावरील खर्च, मेन्टेनन्स खर्च इत्यादी बाबींचा विचार करता मनपाच्या हिताच्या दृष्टीकोनातून मासिक भाडे रू.87,450/- तसेच 120 दिवसांपेक्षा जास्तीचे आरक्षण झाल्यास त्यापासून मिळणाऱ्या अतिरिक्त उत्पन्नापैकी 50% रक्कम मनपास द्यावी लागेल यासह मनपाच्या नेहमीच्या अटी शर्तीस अधीन राहून कै.पुंडलिकराव ताठे मंगल कार्यालय/सभागृह व त्यासमोरील खुली जागा निकीता सुशिक्षित बेरोजगार सेवा सहकारी संस्था यांना पाच वर्षासाठी देण्यास व या कालावधीत संस्थेने नियमित भाडे भरणा केल्यास पुढील पाच वर्षासाठी मुदतवाढ देऊन भाडेतत्वावर देण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 42 : बीओटी विभाग**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, रेल्वेस्टेशन न.भू.क्र.19149 येथील व्यापारी संकुलातील मनपा हिश्यातील 580.00 चौ.मी. बांधीव क्षेत्र व 290 चौ.मी. वाहनतळ असलेली इमारत निविदेतील अटी व शर्तीनुसार भाडे तत्वावर देणे बाबत जा.क्र./मनपा/बीओटी/2014/512,दिनांक 15/01/2014 अन्वये

दैनिक वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्द करण्यात आली होती. सदरची निविदा विक्रीचा दिनांक 17/01/2014 ते 31/01/2014 या कालावधीत निश्चित करण्यात आला होता. परंतु सदर कालावधीमध्ये दोन निविदा प्राप्त झाल्यामुळे निविदा प्रक्रियेस मुदतवाढ देण्यात आली. व निविदा दाखल करण्याचा अंतिम दिनांक 13/02/2014 पावेतो तीन निविदा लेखा विभागाकडे दर भरून प्राप्त झाल्या त्या बाबतचा तपशिल खाली दर्शविण्यात येत आहे.

| **अ.क्र.** | **निविदा धारकाचे नांव** | **देकार दर प्रति वर्ष भाडेपट्टा रक्कम** |
|---|---|---|
| 01. | मे.आयकॉन इलेक्ट्रीकल्स्, दुकान नं.5 लँडमार्क कॉर्नर, त्रिमुर्ती हौ.सो. कटकटगेट, औरंगाबाद | रूपये 90,000/- प्रति माह |
| 02. | श्री.साई बोर्ड मिल्स, औरंगाबाद | रूपये 55,225/- प्रति माह |
| 03. | श्री.रेफ्रिजरेशन इलेक्ट्रीकल्स, औरंगाबाद. | रूपये 55,000/- प्रति माह |

उपरोक्त दर्शविण्यात आलेल्या गोषवाऱ्याचा तुलनात्मकदृष्ट्या विचार करता मे.आयकॉन इलेक्ट्रीकल्स, यांनी सर्वात अधिक म्हणजेच रक्कम रूपये 90,000/- प्रतिमाह भाडेतत्वावर घेणेसाठी देकार दर सादर केलेला आहे. तथापी मे.आयकॉन इलेक्ट्रीकल्स यांना देकार दराच्या वाटाघाटीसाठी बोलाविण्यात आले असता, त्यांनी मासिक भाडेपट्ट्यामध्ये वाढ करून देण्यास असमर्थता दर्शविली.

करीता प्राप्त देकार दर हे महानगरपालिकेच्या दृष्टीने फायदेशीर असल्याने सदर इमारत तीन वर्षासाठी मे.आयकॉन इलेक्ट्रीकल्स, औरंगाबाद यांना रूपये 90,000/- (अक्षरी रूपये नव्वद हजार फक्त) प्रतिमाह प्रमाणे निविदेतील अटी व शर्तीनुसार भाडेतत्वावर देणेसाठीचा प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेच्या मंजुरीस्तव सादर.

मा.सभापती : प्राप्त झालेले देकार दर हे महानगरपालिकेच्या दृष्टीने फायदेशीर आहेत. उच्चतम देकार धारक मे.आयकॉन इलेक्ट्रीकल्स यांनी नियमित भाडेभरणा करून मनपाच्या अटी शर्तीचे पालन केल्यास अशा यशस्वी निविदाधारकास तीन वर्षानंतरच्या पुढील दीर्घ मुदतीच्या कालावधीसाठी मुदतवाढ देण्यास मंजुरी देण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, रेल्वेस्टेशन न.भू.क्र.19149 येथील व्यापारी संकुलातील मनपा हिश्यातील 580.00 चौ.मी. बांधीव क्षेत्र व 290 चौ.मी. वाहनतळ असलेली इमारत भाडे तत्वावर देणेकरीता प्राप्त निविदा दराच्या गोषवाऱ्याचा तुलनात्मकदृष्ट्या विचार करता मे.आयकॉन इलेक्ट्रीकल्स यांचा रक्कम रूपये 90,000/- प्रतिमाह भाडेतत्वावर घेणेसाठी प्राप्त झालेले देकार दर हे महानगरपालिकेच्या दृष्टीने फायदेशीर आहेत. उच्चतम देकार निविदाधारक मे.आयकॉन इलेक्ट्रीकल्स यांनी नियमित भाडेभरणा करून मनपाच्या अटी शर्तीचे पालन केल्यास अशा यशस्वी निविदाधारकास तीन वर्षानंतरच्या पुढील दीर्घ मुदतीच्या कालावधीसाठी मुदतवाढ देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 43 : मालमत्ता विभाग**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मोहल्ला एन-2 सिडको, विठ्ठलनगर येथील कम्युनिटी सेंटर महानगरपालिकेच्या ताब्यातील हॉल बोधी एज्युकेशनल ॲन्ड रिसर्च सेंटर या संस्थेने भाडेतत्वावर मिळणेसाठी विनंती केली आहे. सदरील हॉलचे क्षेत्रफळ 285.91 चौ.मी. असून सन 2014 च्या सिध्द शिघ्र गणकानुसारचे भाडे रू.60164/- प्रतिमाह (इतर कर वेगळे) एवढे होते. तथापी सदरील हॉलचे बांधकाम हे 15 वर्षापूर्वीचे असून महानगरपालिकेच्या मंजुर धोरणानुसार मा.स्थायी समिती सभा दिनांक 28/02/2014 रोजी संपन्न झालेल्या बैठकीतील पारीत झालेल्या ठराव क्र.216 अन्वये ज्या हॉलचे बांधकाम पंधरा वर्ष किंवा त्याहुन जास्त कालावधीचे असल्यास मनपाच्या मालमत्तेचे जतन, संरक्षण व्हावे तसेच मनपास काही प्रमाणात

महसूल मिळावा या दृष्टीकोनातून सदर हॉल, इमारत यांचे मेंन्स्टेनन्स व लाईट बिलाचा खर्च संबंधीत संस्थेने करण्याच्या अटीवर आर.आर.दराच्या 10% ते 20% दराआधारे भाडे निश्चित करून भाडेतत्वावर देण्याबाबतचे धोरण ठरविण्यात आले आहे.

मा.स्थायी समितीच्या वर नमुद केलेल्या धोरणानुसार बोधी एज्युकेशनल ॲन्ड रिसर्च सेंटर या संस्थेस सदरील हॉल महानगरपालिकेच्या नेहमीच्या अटी शर्तीस अधीन राहून भाडेतत्वावर देण्याचा प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

संवाद :

मा.सभापती : प्रस्तावात नमुद केल्यानुसार व सन्माननीय सदस्यानी या अगोदरच्या प्रस्तावावरील चर्चेच्या वेळी सूचना केल्याप्रमाणे पंधरा वर्षापेक्षा जास्त काळापासून विनावापर पडून असलेल्या मनपाच्या मालमत्तेचे जतन, संरक्षण व्हावे तसेच मनपास काही प्रमाणात महसूल मिळावा या दृष्टीकोनातून सदर हॉल, इमारत यांचे मेंन्टेनन्स व लाईट बिलाचा खर्च संबंधीत संस्थेने करण्याच्या अटीवर आर.आर.च्या 10% दरा आधारे भाडे निश्चित करून पाच अधिक पाच वर्ष कालावधीसाठी देण्यात यावे. पहिल्या पाच वर्षाच्या कालावधीत संस्थेने नियमित भाडे भरणा केल्यास पुढील पाच वर्ष असे एकूण दहा वर्ष कालावधीसाठी भाडेतत्वावर देण्यास मंजुरी देण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व सभागृहात झालेल्या चर्चेनुसार मोहल्ला एन-2 सिडको, विठ्ठलनगर येथील कम्युनिटी सेंटर या महानगरपालिकेच्या ताब्यातील सदर हॉलचे बांधकाम पंधरा वर्षापुर्वीचे आहे. महानगरपालिकेच्या मालमत्तेचे जतन, संरक्षण व्हावे तसेच मनपास काही प्रमाणात महसूल मिळावा म्हणून स्थायी समिती ठराव क्र.216 दि.28/2/2014 च्या धोरणाप्रमाणे मनपाच्या हिताच्या दृष्टीने सदर हॉल/इमारतीचे मेन्टेनन्स व लाईट बीलाचा खर्च संस्थेने करण्याच्या अटीवर आर.आर.दराच्या 10% दरा आधारे भाडे निश्चित करून बोधी एज्युकेशनल ॲन्ड रिसर्च सेंटर या संस्थेस पाच + पाच असे एकूण दहा वर्षासाठी देण्यास आणि पहिल्या पाच वर्षाच्या कालावधीत संस्थेने नियमित भाडे भरणा केल्यास पुढील पाच वर्ष कालावधीसाठी मुदतवाढ देऊन भाडेतत्वावर देण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 44 : यांत्रिकी विभाग**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, घनकचरा संकलन व वाहतुकीच्या कामासाठी सद्यस्थितीत महानगरपालिकेची खालील प्रमाणे यंत्रणा वार्डनिहाय कार्यरत आहे.

| वार्ड | स्कीपलोडर | हुक लोडर | ट्रक/टिप्पर्स | ॲटोटिप्पर्स | हायड्रोलिक हॉपर्स |
|---|---|---|---|---|---|
| अ | 1 (10 बिन्स सह) | 1 (5 कंटेनर) | 6 | 05 | 03 |
| ब | 1 (10 बिन्स सह) | 1 (5 कंटेनर) | 5 | 06 | 04 |
| क | 1 (10 बिन्स सह) | 1 (5 कंटेनर) | 4 | 06 | 03 |
| ड | 1 (10 बिन्स सह) | 1 (5 कंटेनर) | 3 | 08 | 02 |
| इ | 1 (10 बिन्स सह) | 1 (5 कंटेनर) | 5 | 07 | 03 |
| फ | 2 (15 बिन्स सह) | 1 (5 कंटेनर) | 4 | 08 | 03 |
| एकुण | 07 | 06 | 27 | 40 | 18 |

शहरात दररोज संकलीत होणारा जवळपास 500 मेट्रीक टन घनकचरा वाहतुक करण्यासाठी महानगरपालिकेची यंत्रणा कमी पडत असल्यामुळे 10 टिप्पर्स व 13 ट्रॅक्टर्स किरायाने घेण्यात आलेले आहेत. खालीलप्रमाणे खाजगी वाहने सद्यस्थितीत कार्यरत आहेत.

| अ.क्र. | वार्ड | खाजगी वाहने |
|---|---|---|
| 1 | अ | 02 टिप्पर्स |
| 2 | ब | 07 ट्रॅक्टर्स |
| 3 | क | 02 टिप्पर्स |
| 4 | ड | 03 टिप्पर्स |
| 5 | इ | 01 टिप्पर्स, 04 ट्रॅक्टर्स |
| 6 | फ | 02 टिप्पर्स, 02 ट्रॅक्टर्स |
| | एकुण | 10 टिप्पर्स, 13 ट्रॅक्टर्स |

13 वा वित्त आयोग निधी मधुन एक हुकलोडर मशिन व 18 हुकलोडर कंटेनर्स खरेदी करण्यात येत असून, सदरील यंत्रणा आगामी दोन महिन्यांच्या कालावधीत प्राप्त होणार आहे. ही यंत्रणा प्राप्त झाल्यानंतर प्रत्येक जुन्या हुकलोडर मशिनला दोन कंटेनर्स वाढवुन देण्यात येणार असून, नवीन 01 हुकलोडर मशिन 07 कंटेनर्ससह कार्यरत होणार आहे. नवीन मशिनरी प्राप्त झाल्यावर किरायाचे 07 टिप्पर्स व 01 ट्रॅक्टर्स बंद करणे शक्य होणार असून, 03 टिप्पर्स व 12 ट्रॅक्टर्स ही किरायाची वाहने मात्र सुरू ठेवावी लागणार आहेत. ही खाजगी वाहने सहा महिने कालावधीसाठी किरायाने घेण्यास रूपये 49,11,660/- च्या अंदाजपत्रकास मान्यता मिळाल्यास जाहिर निविदा मागवुन वाहने किरायाने घेण्यासाठी दर निश्चिती करण्यात येईल.

करीता घनकचरा व्यवस्थापनाच्या कामासाठी तीन टिप्पर्स व 12 ट्रॅक्टर्स सहा महिने कालावधीसाठी किरायाने घेण्यासाठी अपेक्षीत रूपये 49,11,660/- खर्चाचे अंदाजपत्रक मा.स्थायी समिती सभेच्या अवलोकनार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, घनकचरा संकलन व वाहतुकीच्या कामासाठी घनकचरा व्यवस्थापनाच्या कामासाठी तीन टिप्पर्स व 12 ट्रॅक्टर्स सहा महिने कालावधीसाठी किरायाने घेण्यासाठी तयार करण्यात आलेल्या अपेक्षीत रक्कम रूपये 49,11,660/- च्या खर्चाचे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र. 45 :</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, श्री.वरखेडेश्वरी चॅरीटेबल ट्रस्ट, औरंगाबाद याना मो.जयहिंद कॉलनी येथील महानगरपालिका मालकीच्या सिटी मार्बल येथील इमारतीमध्ये पहिल्या मजल्यावरचा हॉल दिर्घमुदतीवर भाडेपट्ट्याने देण्यासाठी मा.स्थायी समिती सभा दिनांक 05/12/2009 रोजी ठराव क्रमांक 239 अन्वये मंजुरी दिलेली आहे. तसेच सदर हॉलचे भाडे आकारणीसाठी प्रकरण मा.स्थायी समिती सभा दिनांक 23/02/2010 रोजी क्रमांक 447 अन्वये व प्रशासकीय प्रस्ताव मा.स्थायी समिती दिनांक 29/04/2011 (का.प.क्र.18) विषय क्रमांक 260 अन्वये भाडे आकारणी 78/- रूपये (प्रति चौ.मी.प्रतिमाह) प्रमाणे करून सदरील संस्थेस भाडेप्रमाणे देण्यासाठी मंजूरी दिलेली आहे. तसेच मा.सर्वसाधारण सभा दिनांक 07/09/2011 अन्वये ठराव क्रमांक 433 प्रमाणे सदरील हॉल उपरोक्त प्रमाणे भाडे भरणा करून रितसर करारनामा करून संबंधीत संस्थेस भाडेपट्ट्याने देण्यात आला आहे.

तसेच श्री.वरखेडेश्वरी चॅरीटेबल ट्रस्ट यांना संबंधीत इमारतीमधील तळमजल्यावरील महानगरपालिका मालकीचा ज्याचे क्षेत्रफळ 167.615 चौ.मी. असलेला हॉल जेथे अगोदर आरोग्य विभागाचे डाटा सेंटर होते, सदरील हॉल आता रिकामा झाला आहे. तो हॉल उपरोक्त दराने प्रति चौ.मी.

प्रतिमाह रूपये 78/- प्रमाणे भाडे आकारणी करून प्रतिमाह रूपये 13074 प्रमाणे तसेच पहिल्या मजल्यावरील हॉल ठराव क्रमांक 239 दिनांक 05/12/2009 रोजीच्या मा.स्थायी समिती सभेमधील ठरावात नमुद केल्याप्रमाणे दिर्घ मुदती ऐवजी महानगरपालिकेने फक्त तीन वर्षाचा करारनामा केला असल्याने सदरील करारनामा पुढील तीस वर्षासाठी सुधारीत करारनामा करून महानगरपालिकेच्या नेहमीच्या अटी शर्तीस अधीन राहुन भाडे तत्वावर देण्यासाठी प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री.रवि कावडे अनुमोदक : श्री.अनिल जैस्वाल

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, श्री.वरखेडेश्वरी चॅरीटेबल ट्रस्ट, औरंगाबाद याना मो.जयहिंद कॉलनी येथील महानगरपालिका मालकीच्या सिटी मार्बल येथील इमारतीमध्ये पहिल्या मजल्यावरचा हॉल दिर्घमुदतीवर भाडेपट्ट्याने देण्यासाठी स्थायी समिती दिनांक 29/04/2011 (का.प.क्र.18) ठराव क्रमांक 260 अन्वये 78/- रूपये (प्रति चौ.मी.प्रतिमाह) प्रमाणे भाडे आकारणी करून सदरील संस्थेस भाडेप्रमाणे देण्यासाठी यापुर्वीच मंजूरी मिळालेली असल्याने श्री.वरखेडेश्वरी चॅरीटेबल ट्रस्ट यांनी मागणी केल्यानुसार तळमजल्यावरील 167.615 चौ.मी. क्षेत्रफळ असलेला रिकामा हॉल उपरोक्त दराने प्रति चौ.मी. प्रतिमाह रूपये 78/- प्रमाणे भाडे आकारणी करून भाडेतत्वावर देण्यास त्याचप्रमाणे पहिल्या मजल्यावरील हॉलसाठी ठराव क्रमांक 239 दिनांक 05/12/2009 रोजीच्या मा.स्थायी समिती सभेमधील ठरावात नमुद केल्याप्रमाणे दिर्घ मुदती ऐवजी महानगरपालिकेने फक्त तीन वर्षाचा करारनामा केला असल्याने पुढील तीस वर्षासाठी सुधारीत करारनामा करून महानगरपालिकेच्या नेहमीच्या अटी शर्तीस अधीन राहुन भाडे तत्वावर देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र. 46 :</u>**

प्रस्ताव सादर केला आहे की, वार्ड क्र.80 संतोषीमातानगर येथील नाल्यावर पुल बांधणे बाबत (मस्जिद जवळ) च्या कामाचे अ.प. सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सन 2013-14 च्या दरसुचीनुसार रक्कम रूपये 3418706/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. या कामाचा खर्च सन 2014-2015 या आर्थिक वर्षात नाला ट्रेनिंग कामे या लेखाशिर्षकामधुन करण्यात येईल.

तरी अंदाजपत्रक रक्कम रू.3418706/- चा प्रस्ताव मा.स्थायी समिती समोर मंजुरीस्तव व विचारास्तव सादर.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.80 संतोषीमातानगर येथील नाल्यावर पुल (मस्जिद जवळ) बांधणेच्या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रूपये 3418706/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

याच बरोबर मा.सभापती यांनी राष्ट्रगीताने सभा संपन्न झाल्याचे घोषित केले.

**(प्रमोद का. खोब्रागडे)**
नगर सचिव,
महानगरपालिका औरंगाबाद